रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३९
www.ramprahar.com
सोमवार, २५ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

‘प्रत्येक तालुक्यातील १० गावे स्मार्ट, इंटेलिजंट करणार’/२
खारघर, कामोठ्यात रस्ते दुरुस्ती कामाला वेग/६
श्रीवर्धन शहरात वाहतूक कोंडीची समस्या जटील/७

## चाकरमानी निघाले गावाला! वाहनांच्या रांगा



**रायगड :** गणेशोत्सवासाठी दोन दिवस शिल्लक असल्याने मुंबई, ठाणे, नवी मुंबई तसेच इतर विविध ठिकाणांहून अनेक गणेशभक्त कोकणात आपल्या गावी जाण्यासाठी निघाले आहेत. कोकणात जाण्याकरिता अतिरिक्त रेल्वेगाड्या, जादा बसेसची व्यवस्था प्रशासनाकडून करण्यात आली आहे. तरीही भाविकांचा रेटा अधिक असल्याने मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव, लोणारेजवळील परिसरात सहा ते सात किमीपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र पहायला मिळाले. रविवार असल्याने तसेच कोकणात जाणार्‍या वाहनांची संख्या वाढल्याने वाहतूक कोंडीचा फटका बसला. दरम्यान, प्रवाशांच्या सोयीसाठी पोलीस यंत्रणा महामार्गावर तैनात असून मोटरसायकल पेट्रोलिंगही होत आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कार्य आदर्शवत

## रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांचे गौरवोद्गार

### साताराच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये साकारली रामशेठ ठाकूर अभ्यासिका

### मुलांच्या वसतिगृहासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून ५० लाखांची देणगी जाहीर

**सातारा : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे समाजातील अत्युच्च आणि महान व्यक्तिमत्व असून त्यांनी केलेल्या समाजसेवा कार्याचा आदर्श सर्वांसाठी महत्त्वपूर्ण आहे, अशा गौरवोद्गारांतून रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सातारा येथे सन्मान केला.

संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या देणगीतून सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेज येथे साकारण्यात आलेल्या रामशेठ ठाकूर अभ्यासिका आणि सौ. मिनल व श्री. अमोल उनउने यांच्या देणगीतून साकार झालेल्या प्राचार्य शंकरराव उर्फ बापूसाहेब ऊनउने स्मृती दालन व मराठी भाषा प्रयोगशाळेचे लोकार्पण शनिवारी (दि. २३) संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते समारंभपूर्वक झाला.



त्या वेळी ते बोलत होते.

या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे व्हाईस चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, सचिव विकास देशमुख, जे.के. बापू जाधव, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी छत्रपती शिवाजी कॉलेजमधील मुलांच्या वसतिगृहासाठी तब्बल ५० लाख रुपयांची देणगी जाहीर केली. विद्यार्थ्यांसाठी ही देणगी मोठा दिलासा ठरणार असून यामुळे उच्च दर्जाच्या राहण्याच्या सुविधा व समृद्ध शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी योग्य व सकारात्मक वातावरण निर्माण होईल. त्यामुळे ग्रामीण तसेच उपनगरातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होईल आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यास हातभार लागणार आहे. समाजातील सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या या कार्यातून सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण प्रस्थापित झाले आहे. या उदार देणगीबद्दल कॉलेज प्रशासनाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे.

अ‍ॅड. भगीरथ शिंदे, डॉ. ज्ञानदेव मस्के प्रा. डी.ए. माने, मीनल उनउने यांनी मनोगते व्यक्त केले. छत्रपती शिवाजी कॉलेज साताराचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. **(पान २ वर..)**

## लालबागच्या राजाची पहिली झलक



**मुंबई : गणेशोत्सवामध्ये मुंबईतील प्रमुख आकर्षण असलेल्या लालबागचा राजाची पहिली झलक रविवारी सर्वांना पहायला मिळाली. लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची स्थापना १९३४मध्ये झाली. हे मंडळ परळ परिसरातील लालबाग येथे आहे. या गणपतीचे दर्शन घेण्यासाठी देशभरातून भाविक येतात आणि खूप वेळ रांगेत उभे राहून बाप्पाचरणी माथा टेकवतात.**

# पनवेलमध्ये रंगला शास्त्रीय नृत्याचा सोहळा; मयूखाचे शानदार लाँचिंग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एकाहून एक सरस शास्त्रीय नृत्याच्या सादरीकरणाने पनवेलची सांस्कृतिक भूमी भारतीय शास्त्रीय नृत्याच्या रंगांनी उजळून निघाली. समृद्ध नृत्य वारशाच्या जतन व प्रसारासाठी समर्पित असा मयूखा महोत्सव नृत्यार्पणा फाईन आर्ट्स सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. परंपरा आणि कलात्मकतेचा संगम असलेला हा महोत्सव नृत्याचा अद्वितीय सोहळा ठरला. या महोत्सवाच्या माध्यमातून मयूखाचे लाँचिंग करण्यात आले.

पनवेल शहरातील विरूपाक्ष मंगल कार्यालय येथे शनिवारी (दि. २३) झालेल्या या महोत्सवाला प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व मयूखा महोत्सव प्रायोजक परेश ठाकूर, अर्चना ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माय भारत रायगड व रत्नागिरी विभागाचे उपसंचालक अमित पुंडे, भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, नॅशनल टेलिफोन अ‍ॅडव्हायजरी कमिटी सदस्य श्री. रमेश, माजी नगरसेवक समीर ठाकूर, माजी





नगरसेविका राजेश्री वावेकर, श्वेता शेट्टी; विशेष पाहुणे म्हणून नालंदा नृत्यकला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उमा रेले, मोहिनीअट्टम नृत्यांगना व संस्थापिका निदेशिका डॉ. डिंपल नायर; तर सेलिब्रिटी पाहुणे म्हणून मल्याळम अभिनेत्री व शास्त्रीय नृत्यांगना देवी चंदना, मराठी अभिनेत्री व शास्त्रीय नृत्यांगना तन्वी पळव यांच्यासह सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर आणि रसिक उपस्थित होते.

कलाकार, रसिक आणि सांस्कृतिकप्रेमींना एका व्यासपीठावर आणण्याच्या दृष्टिकोनातून पद्मभूषण डॉ. कनक रेले यांच्या शिष्या व नालंदा नृत्यकला महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी नयना प्रकाश यांच्या संकल्पना व दिग्दर्शनाखाली हा उत्सव आयोजित आयोजित करण्यात आला होता. महोत्सवात नालंदा बानीतील मोहिनीआट्टमचे नयना प्रकाश यांचे जवळपास दीड तास मनमोहक सोलो सादरीकरण झाले. या सादरीकरणात लास्य व रौद्रम यांचा सुंदर समन्वय दिसून येत होता. त्यामुळे प्रत्येक नृत्यप्रयोग दृश्य व भावनिकदृष्ट्या अद्वितीय ठरला. **(पान २ वर..)**

> **पनवेल एक महानगर बनत असताना रस्ते, विमानतळासारख्या भौतिक पायाभूत सुविधांवर लक्ष देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपली संस्कृती व परंपरा जपण्यावरही लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. या गोष्टी खरोखरच परिभाषित करतात आणि एक महान राष्ट्र बनवतात. त्यामुळे हा वारसा पुढच्या पिढीला देऊन त्यांना पुढे चालवायचा आहे.**
> **-प्रशांत ठाकूर, आमदार**

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचे अवकाश संशोधनासाठी नव्या पिढीला आवाहन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय अवकाश दिनानिमित्त देशातील शास्त्रज्ञांना गंभीर अवकाश संशोधनासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की चंद्र आणि मंगळावर यशस्वी पावले ठेवलेल्या भारताने आता अधिक खोल अवकाशाचा शोध घ्यायला हवा.

मोदी यांनी स्पष्ट केले की भारत अर्ध-क्रायोजेनिक इंजिन्स आणि इलेक्ट्रिक प्रपल्शनसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानात वेगाने प्रगती करत आहे. निकट भविष्यात गगनयान मोहिमेचे प्रक्षेपण होणार असून, पुढील काही वर्षांत भारत स्वतःचे अवकाश स्थानक उभारणार आहे. त्यांनी तरुणांना ‘अंतराळवीर पूल’मध्ये सहभागी होऊन देशाच्या महत्वाकांक्षा साकार करण्याचे आवाहन केले.

खाजगी क्षेत्रालाही मोदींनी पुढे येऊन पुढील पाच वर्षांत किमान पाच मोठे स्पेस युनिकॉर्न्स उभारण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की सध्या वर्षभरात पाच रॉकेट्सचे प्रक्षेपण होते, ते प्रमाण वाढवून आठवड्याला एक म्हणजे वर्षाला ५० प्रक्षेपण करण्याचे लक्ष्य आपण ठेवायला हवे.

आज देशात ३५० हून अधिक स्टार्टअप्स अवकाश क्षेत्रात कार्यरत असून, ते नवोन्मेष आणि प्रगतीचे केंद्र बनले आहेत.

## भाजयुमोतर्फे गणपती सजावट स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहरच्या वतीने गणपती सजावट स्पर्धा २०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील एकूण विजेत्यांना २५ हजार रुपयांची बक्षिसे तसेच आकर्षक चषक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

स्पर्धक हा पनवेल शहरातील रहिवासी असणे बंधनकारक असेल तसेच थर्माकोल वापर केलेली सजावट स्पर्धेसाठी ग्राह्य धरली जाणार नाही. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ८४३३५१३५४० या क्रमांकावर घरातील श्री गणेशाचे व सजावटीचे फोटो व्हॉट्सअ‍ॅप करावे. **(पान २ वर..)**

राम प्रहर
दिवाळी २०२५
मुक्तछंद
मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.
चला तर लागूया कामाला...
ramprahar@gmail.com



# राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील १० गावे स्मार्ट, इंटेलिजंट करणार -मुख्यमंत्री फडणवीस



**नागपूर : प्रतिनिधी**

आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पुढे जात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून शेती, आरोग्य, शिक्षण आदी महत्वाच्या सुविधा सातनवरी गावात उपलब्ध करून देत समृद्ध गावाचे रोल मॉडेल उभे राहिले असून लवकरच राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील १० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. याद्वारे पहिल्या टप्प्यात राज्यातील जवळपास ३ हजार ५०० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करणार असल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

केंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसने (व्हाईस) देशांतर्गत २४ कंपन्यांच्या संघटनांसोबत एकत्र येत राज्य शासन व नागपूर जिल्हा प्रशासनाच्या मदतीने सातनवरी गावात आधुनिक तंत्रज्ञान आधारित सेवा उपलब्ध करून देत या गावाला देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव बनविले आहे. प्रायोगिक तत्वावर उभारण्यात आलेल्या या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते.

या वेळी महसूल तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंह ठाकूर, सातनवरी गावाच्या सरपंच वैशाली चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आदी उपस्थित होते.

तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून गावात सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सातनवरी गावात सुरू झालेला देशातील स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ हे एक क्रांतीकारक पाऊल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. गावांना सक्षम करण्याच्या दिशेने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून देशातील गावागावांमध्ये भारतनेट प्रकल्प राबविला गेला. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची यशस्वी अंमलबजावणी राज्यात झाली व दुसऱ्या टप्प्याची सुरूवातही झाली. याच धर्तीवर महाराष्ट्रात महानेट हा प्रकल्प राबविण्यात आला. आता याच प्रवासात भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारताच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत गावांमध्ये आरोग्य, शिक्षणासोबतच स्मार्ट सिंचन, ड्रोनद्वारे किटकनाशके व खत फवारणी, बँक ऑन व्हिल, स्मार्ट टेहळणी अशा एकूण १८ सेवा कमी वेळात उपलब्ध करून देत सातनवरी हे देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव ठरले आहे.येत्या वर्षात सातनवरी गावाने देशातील सर्वात प्रगतीशील गाव म्हणून नावलौकीक मिळवावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. राज्य शासनाच्या वतीने प्रत्येक तालुक्यात १० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात राज्यातील जवळपास तीन हजार ५०० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्मार्ट सिटी, डिजिटल इंडिया आदी महत्त्वाचे प्रकल्प देशात राबविले. यालाच पुढे घेऊन जात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात स्मार्ट व इंटेलिजंट गाव तयार करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला व नागपूर जिल्ह्याला हा मान मिळाला, ही अभिमानाची बाब आहे. मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने नागपूर जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा नियोजनमधून १२०० कोटींचा भरीव निधी मंजूर केला व यामाध्यमातून जिल्ह्यात विविध विकास कामे सुरू असून सातनवरी गावाच्या माध्यमातून देशात विकसित ग्रामीण भागासाठी डिजिटल गावाची सुरूवात झाल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ए आय तंत्रज्ञानाची मदत

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी आपल्या गावी निघालेल्या गणेशभक्तांना वाहतूककोंडीचा त्रास होऊ नये त्यांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी रायगड पोलीस दल सज्ज झाले आहे. गणेशोत्सव काळात मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पहिल्यांदाच ए आय तंत्रज्ञानाची मदत घेतली जात आहे. एआय तंत्रज्ञानाची मदत घेण्यासाठी मुंबई गोवा महामार्गावर खारपाडा आणि खोपोलीकडून येणारया मार्गावर पाली या ठिकाणी ए आय कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

गणेशोत्सवासाठी मोठ्या संख्येने मुंबईकर चाकरमान्यांनी कोकणाकडे कुच केलं आहे. शनिवारी सकाळपासूनच मुंबई गोवा महामार्गावर वाहनांच्या संख्येत वाढ झाली असून कोकणात जाणाऱ्या मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसत आहे. प्रवासात चाकरमान्यांना त्रास होऊ नये यासाठी रायगड पोलीस महामार्गावर उतरले असून वाहतुकीचं नियोजन करीत आहे.

**या वेळी गणेशोत्सव काळात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पहिल्यांदाच ए आय तंत्रज्ञान वापरले जाणार आहे. यामुळे येणारया वाहनांची नोंद होणार आहे. वाहनांची संख्या लक्षात घेवून वाहतूकीचे नियोजन केले जाईल जेणेकरून वाहतूक कोंडी टाळता येईल.**

**-अभिजित भुजबळ,**
**पोलीस निरीक्षक**
**वाहतूक शाखा**

# रोहा भाजपकडून गणेशभक्तांना गावाकडे मोफत बससेवा!

**धाटाव : प्रतिनिधी**

भक्तांच्या सेवेसाठी सदैव तत्पर भाजप! याच भावनेतून रोहा तालुक्यात यंदा एक भव्य, दिव्य आणि दणक्यात उपक्रम उभा राहिला आहे. भाजपा तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या पुढाकाराने तसेच तालुक्यातील सर्व रोहा भारतीय जनता पक्ष पदाधिकाऱ्यांच्या सहयोगाने रोहा तालुक्यातील वाली, तांबडी, विरजोली, भालगाव अशा ग्रामपंचायतील परिसरातील गणेशभक्तांसाठी मोफत दिशा-मिनिडोअर व बस सेवा सुरू करण्यात आली आहे. जे गणेश भक्त मुंबईहून रेल्वेने रोहात जेव्हा उतरतील तेव्हा त्यांच्या सेवेसाठी रोह्यातील बायपास रोड हॉटेल रोहा प्राईड जवळ मोफत रिक्षा, मिनीडोर, बस सेवा उपलब्ध असणार आहे.

***बस वेळापत्रक***

***सकाळी ३:३०, दुपारी १२:१५ , सायंकाळी ६:३०, रात्री १०:३०, सेवा कालावधी : सोमवार दि. २५ ऑगस्ट २०२५ ते मंगळवार दि. २ सप्टेंबर २०२५, नावनोंदणी संपर्क : ७२७६१९१५४९***

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पावर पॉइंट प्रेसेंटेशन स्पर्धा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथे रामशेठ ठाकूर आणि जीवन महाविद्यालयात नुकतेच वाणिज्य विभागातर्फे प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पावर पॉइंट प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये सादरीकरण कौशल्ये, संवाद कौशल्ये, संशोधन वृत्ती आणि विषयासंबंधी सखोल ज्ञान विकसित करणे हे होते. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी विविध व्यावसायिक विषयांवर विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले, जसे की डिजिटल मार्केटिंग, ई-कॉमर्स, गुंतवणूक नियोजन, बँकिंग प्रणाली, आणि हरित अर्थव्यवस्था इत्यादी. या वेळी विद्यार्थ्यांनी कल्पकतेने व आकर्षक पद्धतीने आपले विषय मांडले.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून विभागातील प्राध्यापक उपस्थित होते, त्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे मुल्यमापन सादरीकरणाची स्पष्टता, माहितीची सुसंगतता, स्लाईड्सची रचना व संवादशैली या निकषांवर आधारित केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच प्रा. विशाल देशमुख वाणिज्य विभाग प्रमुख यांच्या मार्गदर्शनात हा शैक्षणिक उपक्रम घेण्यात आला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करत भविष्यात अशा उपक्रमांत सहभागी होण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी या स्पर्धेचा चांगला अनुभव घेतल्याचे नमूद केले.

# पनवेल महापालिकेची पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची सप्तसूत्री जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरणाच्या रक्षणासाठी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षीही आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी विविध उपक्रम आयोजित केले आहेत.

यामध्ये पनवेल महानगरपालिकेतर्फे पर्यावरणपूरक गणेश सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या विजेत्यांसाठी एकूण एक लाख रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. नागरिकांनी उत्साहाने या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. याच बरोबर महापालिकेच्यावतीने पर्यावरण पूरक गणेशोत्सवाची सप्तसूत्री जाहीर करण्यात आली आहे.या सप्तसूत्रीचा नागरिकांनी अवलंब करावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

पर्यावरणाचे संक्षणार्थ नागरिकांनी कृत्रिम तलावात बाप्पाचे विसर्जन करण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. यासाठी महापालिकेच्यावतीने पालिका क्षेत्रात सुमारे ७६ ठिकाणी कृत्रिम तलावांची निर्मितीचे काम सुरू आहे

## ▪ *सप्तसूत्रीमध्ये असा आहे समावेश*

*गणेशाची मूर्ती शाडू मातीची किंवा लाल मातीची असावी. घरातील लहान मुलांनी घडवलेल्या मातीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून पर्यावरणपूरक वारसा पुढील पिढीला द्यावा. मूर्तीला शक्यतो नैसर्गिक रंगांचा वापर करावा. मखर व सजावट कापड, कागद किंवा फुलांची असावी. आराधनेवेळी पारंपरिक वाद्यांचा वापर करून मंगलमय संगीत कमी आवाजात करावे. विसर्जन घरच्या घरी मोठ्या ड्रममध्ये स्वच्छ पाण्यात मंगलद्रव्य घालून करावे. विसर्जनावेळी आलेले निर्माल्य वेगळ्या निर्माल्य कलशात जमा करावे.*

# 'मोठ्या मूर्तींबाबत सरकारने सकारात्मक विचार करून सहकार्य करावे'

**मुंबई : प्रतिनिधी**

न्यायालयाच्या आदेशामुळे बंदी घातलेल्या पीओपी मूर्तींच्या विसर्जनास सरकारच्या प्रयत्नांमुळे यंदा परवानगी मिळाली, मात्र मोठ्या मूर्तींचा प्रश्न अजून कायम आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने अजून सकारात्मक विचार करत सहकार्य करावे अशी मागणी अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघाचे कार्यवाह सुरेश सरनोबत यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी काकोडकर समितीचा अहवाल सादर करून तो न्यायालयात मांडला. त्यानंतर पीओपी मूर्तीला परवानगी मिळाली. महाराष्ट्रात सुमारे ४५ हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे असून, त्यापैकी १२ हजार मंडळे मुंबईत आहेत. या उत्सवात १० ते १५ हजार कोटी रुपयांची उलाढाल होते. असे प्रमुख कार्यवाह प्रवीण आवारी यांनी सांगितले.

महापालिकेकडून 'वन विंडो योजना' अंतर्गत सर्व परवानग्या ऑनलाईन-ऑफलाईन उपलब्ध कराव्यात, विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची सुरक्षित व सक्षम व्यवस्था करावी, गिरगाव चौपाटी व पवईसह प्रमुख ठिकाणी लाईव्ह टेलिकास्ट व योग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, लालबागचा राजा व जीएसबी मंडळात देश-विदेशातून येणाऱ्या भक्तांसाठी पार्किंगची सोय व्हावी, गर्दी नियंत्रणासाठी गणसेवक घडवावेत आणि पोलिस विभागाशी समन्वय साधावा, असे हरिश्चंद्र अहिर, आत्माराम म्हात्रे, विवेक भाटकर यांनी सांगितले.

# झेनित वॉटर फॉल परिसराची खालापूर तहसीलदारांनी केली पाहणी





**चौक :** खोपोली येथील प्रसिद्ध झेनित वॉटर फॉल व परिसराची खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी पाहणी केली.

दिवसाला शेकडो पर्यटक येथे येत असतात, या वॉटर फॉल ची ज्यांना माहिती असते, ते सुरक्षित पर्यटनाचा आनंद घेतात, जे अनभिज्ञ असतात, जे अती उत्साही असतात त्यांच्यावर कडी नजर ठेवावी लागते. अन्यथा त्यांच्यावर जीवघेणा प्रसंग ओढवतो.

गेले काही दिवस मुसळधार पावसामुळे आणि आलेल्या पर्यटकांना माहिती नसल्याने त्यांच्यावर बाका प्रसंग आला होता, पण अपघातग्रस्त यांना मदत करणारी सामाजिक संस्था व हेल्फ फाऊंडेशन यांच्या मदतीने मोठे रेस्क्यू ऑपरेशन करून पंधरा पर्यटकांना सुखरूप सुटका करण्यात आली. खोपोली आणि परिसरात अनेक पावसाळी पर्यटनाचा आनंद देणाऱ्या जागा आहेत, खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी झेनित वॉटर फॉल येथे जाऊन परिस्थितीची पाहणी केली, असे प्रसंग पुन्हा येऊ नये यासाठी काय प्रयत्न करावे लागतील, यावर चर्चा करण्यात आली.

यावेळी त्यांच्या समवेत निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, मंडळ अधिकारी भरत सावंत, हेल्फ फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर व त्यांची टीम, पोलीस यंत्रणा, खोपोली नगर परिषदचे उपमुख्यधिकारी रणजित पवार, महसूल अधिकारी लदगे उपस्थित होते.

# उत्तर भारतीय ढोलकी विक्रेते अलिबागमध्ये दाखल



**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभुमीवर दरवर्षी अनेक उत्तर भारतीय ढोलकी विक्रेते कोकणात येत असतात. यंदा देखील हे ढोलकी विक्रेते रायगड जिल्ह्यात दाखल झाले आहेत.

रायगड जिल्ह्यातील पेण येथे मुंबई गोवा महामार्ग आणि रेल्वे स्थानका लगतच्या परिसरात काही ढोलकी विक्रेते मुक्काम ठोकून आहेत. अलिबाग शहराजवळ असलेल्या बायपास मार्गांवर देखील हे ढोलकी विक्रेते व त्यांच्या कुटुंबीयांनी मुक्काम केला आहे. पेण येथे मुक्काम करून ते वेगवेगळ्या प्रकारच्या ढोलक्या बनवतात आणि रायगड जिल्ह्यात विविध भागात जाऊन ते ढोलक्या विकतात.

गणेशोत्सवात ढोलक्यांना मोठी मागणी असते. त्यामुळे दरवर्षी हे ढोलकी विक्रेते उत्तर भारतातून कोकणात येतात. आणि , गावात जाऊन ढोलक्या विकतात, त्यातून चांगले पैसेही मिळतात.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कार्य आदर्शवत



डॉ. विद्या नावडकर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. आबासाहेब उमाप यांनी आभार मानले. कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, हितचिंतक तसेच छत्रपती शिवाजी कॉलेजचे आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये रंगला शास्त्रीय नृत्याचा सोहळा; मयूखाचे शानदार लॉंचिंग

या महोत्सवात नालंदा बानीतील मोहिनीयट्टम ख्यातनाम वादकांचा थेट वाद्यमेळ पनवेल व परिसरातील कला-रसिकांना एक सांस्कृतिक मेजवानीसुद्धा देऊन गेला. कलाश्री कलामंडलम सी. गोपाळकृष्णन यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्यकलामंदिरम् सेंटर फॉर आर्ट्समार्फत त्याचे सादरीकरण झाले. त्यामुळे प्रेक्षकांना एक अद्वितीय असा सांस्कृतिक अनुभव अनुभवायला मिळाला. परंपरा आणि कलात्मकतेचा संगम असलेला हा कार्यक्रम रसिकांसाठी एक पर्वणी आहे.

मयूखा हे असे व्यासपीठ आहे जे केवळ शास्त्रीय नृत्यप्रकारांची गहनता आणि सौंदर्य प्रदर्शित करत नाही, तर पुढील पिढीतील कलाकारांना प्रोत्साहन देते. नृत्यार्पणा फाईन आर्ट्स सेंटर या उपक्रमाद्वारे तरुण नर्तकांना प्रेरणा देण्याचे आणि प्रेक्षकांना भारताच्या पारंपरिक कलांचा खरा आस्वाद आणि संवर्धन करण्याचे प्रयत्न करते. त्यामुळे आता त्याचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी या महोत्सवाच्या माध्यमातून मयूखाचे लॉंचिंग करण्यात आले.

**आपले पनवेल म्हणजे आगरी, कोळी, कराडी, भंडारी, मराठा आणि विविध जातीच्या लोकांना सामावलेला परिसर आहे. जिथे नृत्य, संगीत आणि त्याचबरोबर चांगले असे विचार घेऊन चालणारा समाजही या पनवेलची ओळख आहे. आता पनवेल परिसर हा कॉस्मोपॉलिटन असा होत चालला असताना पनवेलमध्ये मयूखा हा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम झाल्याबद्दल सर्व आयोजकांचे अभिनंदन! या कार्यक्रमांमुळे पनवेलची संस्कृती आणखी वाढत जाईल. येणाऱ्या काळातदेखील अशा प्रकारचे कार्यक्रम व्हावेत यासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्षाचे नेहमीच सहकार्य लाभेल.**

**-परेश ठाकूर, माजी सभागृह नेते, पनवेल महापालिका**



## भाजयुमोतर्फे गणपती सजावट स्पर्धा

यासाठी अंतिम नोंदणीची अंतिम तारीख २८ ऑगस्ट आहे. अधिक माहितीकरिता कोमल कोळी (९८२०८९८८०६), शुभम कांबळे (९८६७५४७१३४), अनिमेश पटवर्धन (९०२९०८५००८) किंवा स्वरूप मुंबईकर (७५०६६३७४३७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शेलघर गावातील रस्त्याचे उद्घाटन

## ◆ भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या गौण खनिज योजनेंतर्गत आमदार महेश बालदी यांनी मंजुर केलेल्या तालुक्यातील शेलघर गावातील अंतर्गत रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. या रस्त्याचे उद्घाटन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, भाजप महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष अ‍ॅड. योगिता सुहास भगत, विश्वनाथ कोळी, जयवंत देशमुख, हेमंत ठाकूर, भाऊ शेठ भोईर, अनंता ठाकूर, अमृत भगत, सुहास भगत, रमेश घरत, श्रीकांत घरत, अजय भगत, उदय भगत, ज्ञानेश्वर म्हात्रे, संतोष भगत, सुदर्शन घरत, रणजीत भगत, महेश भगत, राहुल भगत, विदुला कंट्रक्शनचे कॉन्टॅक्टर मयूर ठाकूर आदी उपस्थित होते.

# संस्कारांशिवाय मिळवलेली विद्या फार काळ टिकत नाही



## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आजच्या काळात संस्कारांची नितांत आवश्यकता आहे. संस्कारांशिवाय मिळवलेली विद्या फार काळ टिकत नाही. ज्याच्याकडे संस्कारांचे अधिष्ठान असेल, त्याच्याकडे विद्या अधिकाधिक समृद्ध होत जाते, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वरसंस्कार संगीत विद्यालयाच्या ११ व्या वर्धापन दिनावेळी केले.

पनवेल येथील स्वरसंस्कार संगीत विद्यालयाचा ११ वा वर्धापन दिन व गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. हा भव्य सोहळा ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहामध्ये शनिवारी पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाच्या संचालिका अ‍ॅड. सुरेखा प्रशांत भुजबळ यांनी केले होते. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल विधानसभा आमदार, प्रशांत ठाकूर आणि अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाचे व्यवस्थापक संदीप वाळके, फॉरेन्सिक लॅब ऑफिसर संपदा दाते, माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, रायगड-भूषण, गुरुवर्य प्रसाद सुतार, अ‍ॅड. सरोज गोंधळी, अ‍ॅड. सुरेश धाकड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या वेळी स्वरसंस्कार संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शास्त्रीय, उपशास्त्रीय, सुगम संगीत, तबला, पेटी, गिटार आणि नृत्य अशा विविध कलांचे सादरीकरण केले. त्यांच्या अप्रतिम सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमातून भारतीय संगीत आणि नृत्य कलांना प्रोत्साहन देण्याची आणि त्यांचे जतन करण्याची विद्यालयाची बांधिलकी दिसून आली.

# आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५

## ◆ वक्तृत्व स्पर्धेची आज महाअंतिम फेरी; ७१८ विद्यार्थी सज्ज

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक : वक्तृत्व स्पर्धा २०२५ या उपक्रमाची महाअंतिम फेरी सोमवारी (दि.२५) होणार आहे. १६,८८७ स्पर्धकांमधून निवडलेले तब्बल ७१८ विद्यार्थी या भव्य फेरीत आपले वक्तृत्व कौशल्य सादर करणार असून, विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि विचारशक्ती सादर करण्यासाठी ही एक अनोखी संधी ठरणार आहे.

या फेरीसाठी सी. के. ठाकूर कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, खांदा कॉलनी आणि पनवेल महानगरपालिका शाळा, लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, पनवेल ही दोन केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

विद्यार्थ्यांना या फेरीत माझा आवडता सुपरहीरो, जर मी पक्षी असतो, माझा आवडता विज्ञाननायक, स्वच्छ भारत, प्लास्टिकमुक्त भारत, इंटरनेट - वरदान की शाप?, कृत्रिम बुद्धिमत्ता - धोका की वरदान?, वेळेचे महत्त्व, अपयश हे यशाचे पायरी आहे अशा विविध, विचार प्रवृत्त करणाऱ्या विषयांवर भाषण करण्याची संधी मिळणार आहे.

या स्पर्धेत पनवेल तालुका व परिसरातील अनेक शाळांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला गेला आहे. यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर शाळा, उलवे, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल, कामोठे, सुधागड एज्युकेशन सोसायटी पालीचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कळंबोली, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे, सी. के. ठाकूर विद्यालय, नवीन पनवेल, पनवेल महानगरपालिका शाळा, जिल्हा परिषद शाळा मोरबी, कोपरा व खारघरचा यांचा सहभाग आहे

या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, वक्तृत्वकौशल्य, संवादकौशल्य, देहबोली आणि नेतृत्वगुण विकसित करण्याची मोठी संधी उपलब्ध होत आहे. यामुळे मुलांमध्ये सकारात्मक स्पर्धात्मक वृत्ती तर निर्माण होतेच, पण त्यांना सामाजिक प्रश्नांवर आपले विचार मांडण्याचेही व्यासपीठ मिळते.

> **आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा ही केवळ स्पर्धा नसून विद्यार्थ्यांना भविष्याचे सक्षम वक्ते आणि आत्मविश्वासपूर्ण नागरिक घडविण्याची दिशा आहे. या माध्यमातून मुलांमध्ये नेतृत्वगुण आणि विचार करण्याची क्षमता विकसित होत आहे.**
>
> **-स्पर्धा प्रमुख तथा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, कोशिश फाऊंडेशन**

# चोरीला गेलेली गाडी नदीत सापडली

**पनवेल :** रात्रीच्या वेळी चोरलेली गाडी अज्ञात चोरट्याने गावाजवळील नदीत टाकून तो पसार झाल्याची घटना घडली असून गावकर्यांना याबाबतची माहिती मिळताच त्यांनी ती गाडी पाण्यातून बाहेर काढली आहे. पनवेल जवळील भिंगारी येथे कांदेवाडी या ठिकाणी राहणाऱ्या एका डबेवाल्यांची दुचाकी गाडी ज्याची किंमत जवळपास १ लाख ४० हजार रुपये इतकी आहे ती अज्ञात चोरट्याने चोरली. ही चोरी त्या भागातील सीसीटीव्हीमध्ये दिसून आली आहे. त्यानंतर सदर गाडी ही गावाजवळील नदीमध्ये टाकून दिल्याचे आढळून आले आहे. ग्रामस्थांनी त्वरित तेथे धाव घेवून सदर गाडी पाण्यातून बाहेर काढली आहे. आता अज्ञात चोरट्याचा शोध ग्रामस्थ करीत आहेत.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी कट्ट्याचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप तळोजा शहराच्या वतीने तळोजा येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी कट्ट्याची निर्मिती करण्यात आली असून, त्याचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पार पडले. हा कट्टा माजी सरपंच संतोष पाटील आणि दीपक पाटील यांच्या निधीतून बांधण्यात आला आहे.

ज्येष्ठ नागरिकांना एकत्र येऊन विरंगुळ्याचे क्षण घालवता यावेत, गप्पा मारता याव्यात, या उद्देशाने या कट्ट्याची निर्मिती करण्यात आली आहे. उद्घाटन सोहळ्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, संतोष भोईर, नितीन भोईर, बबनराव बारगजे, नितेश पाटील, संदिप बांदेकर, नवनाथ भोजने, अशोक वीरकर, गोरख शिंदे, मनीष नागडे, हनुमंत डवले, प्रशांत काळे, सुमित गव्हाणे, देविदास बर्डे, एकनाथ पटणे, अशोक खोपडे, औबा कांबळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## निवडक

### अज्ञात गाडीच्या धडकेने दोघे जखमी

**पनवेल :** गार्डन हॉटेल सिग्नल जवळील एका अज्ञात गाडीने पुढे असणाऱ्या दुचाकीला धडक देवून झालेल्या अपघातात दुचाकीवरील दोन जण जखमी झाल्याची घटना घडली. विष्णू रामु सिंदधाबत्तुल्ला (वय ३१) हा त्याची पत्नी साई लाहरी यांना घेवून बजाज अ‍ॅव्हेंजर दुचाकीवरुन जात असताना हॉटेल गार्डन सिग्नल जवळ पाठीमागून पांढर्या रंगाच्या चार चाकी वाहनाने त्यांना धडक दिल्याने झालेल्या अपघातात हे दोघे पती-पत्नी जखमी झाले असून या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### व्हॉटसअ‍ॅप ग्रुपकडून समाजसेवा



**पनवेल :** नवीन पनवेल रहिवासी संघाच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपला दहा वर्षे पूर्ण झाल्याकारणाने सदर संघातील सदस्य यांनी सीकेटी स्कूल नवीन पनवेल येथे एकत्र जमून संघास समाजाचे विविध प्रश्न विविध आस्थापनांकडून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली वेळोवेळी सोडवण्याचे समाधान व्यक्त केले. दहा वर्षे पूर्ण झाल्याकारणाने तसेच पुढील काळात नव्याने निर्माण होणारे प्रश्न सोडवण्याचा निश्चय केला. या वेळी माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, सचिन देसाई, ठाकरे आदी उपस्थित होते.

### शांतता कमिटीची बैठक



**पनवेल :** आगामी गणेशोत्सव तसेच ईद-ए-मिलाद सणाच्या अनुषंगाने शनिवारी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे शांतता कमिटी सदस्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीदरम्यान उपस्थितांना आगामी सण-उत्सव शांततेत पार पाडणे बाबत आवाहन करण्यात आले. या बैठकीस व पोनि नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक शाकीर पटेल तसेच शांतता कमिटीचे १८ सदस्य उपस्थित होते. तसेच नमुद बैठकीदरम्यान ईद-ए-मिलाद मिरवणुकीचे आयोजक यांच्याशी चर्चा केली असता ईद-ए-मिलादची मिरवणूक ५ सप्टेंबर रोजी साजरी न करता ती दिनांक ८ सप्टेंबर रोजी आयोजित करणार असल्याबाबतचे संबंधितांनी जाहीर केले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण



**पनवेल : वार्ताहर**

जिल्हा उद्योग केंद्र रायगड-अलिबाग व पनवेल इंडस्ट्रीयल को ऑप इस्टेट लिमिटेड पनवेल यांच्या वतीने शनिवारी (दि.२३) वृक्षारोपण रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रांत अधिकारी पवन चांडक, तहसीलदार विजय पाटील, पनवेल महापालिकेचे उपयुक्त वैभव विधाते, पनवेल इंडस्ट्रीयल को ऑप इस्टेट लिमिटेडचे चेअरमन विजय लोखंडे, उपाध्यक्ष सुवर्णा पुराणिक, संचालक विजय देशमुख, सुनील सुचक, दीप लोखंडे, श्रीजय सुरतकल, ममता त्यागी, व्यवस्थापक दत्तकुमार सावंत, सदस्य. स्वर्णपाल सिंग कोहली, फतेहलाल जैन, अभिषेक धोंड, कृतार्थ पटेल, मंदार पोदार, आदेश कोठारी, कल्पना लोखंडे, सिद्धी लोखंडे उपस्थित होते.

या वेळी जिल्हा धिकारी किशन जावळे यांनी या उपक्रमाचे कौतुक करून वृक्ष रोपणाबरोबरच त्यांचे संवर्धन ही करा असा संदेश दिला. त्यानंतर त्यांनी पनवेल इंडस्ट्रीयल को ऑप इस्टेट लिमिटेडचे चेअरमन विजय लोखंडे यांच्या कारखान्याची पाहणी केली.

# पनवेलमध्ये रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या समाजसेवा विभाग आणि रोटरी ब्लड बँक, न्यू पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. योगिनी दादी प्रकाशमणी यांच्या १८ व्या पुण्यतिथीनिमित्त आणि विश्व बंधुत्व दिनाच्या निमित्ताने या रक्तदान अभियानाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज चौकातील हुतात्मा स्मारक उद्यानामनध्ये करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराचे कौतुक केले. तसेच रक्तदात्यांना प्रमाणपत्राचे वाटप करून सन्मानित केले. या शिबिरामध्ये हिमोग्लोबिन, रक्तदाब, वजन आणि मधुमेह यांसारख्या आरोग्य तपासण्या करण्यात आला असून या रक्तदान शिबीराला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे माजी विरोधीपक्ष नेते प्रितम म्हात्रे, पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, तारादीदी, शौभांगी झेमसे, डॉ. शुभदा नील, डॉ. कुनाल माझिजा आदी उपस्थित होते.




# आमदार महेश बालदींचे गणेश मंडळ उत्कृष्ट गणेशमूर्ती गटात प्रथम



## विघ्नहर्ता पुरस्कार वितरण समारंभात गौरव

**उरण : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने 'सार्वजनिक गणेशोत्सव २०२४' मधील उत्कृष्ट गणेश मंडळांना विघ्नहर्ता पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात नुकताच झाला.

या वेळी पोलीस उपायुक्त, परिमंडळ ३चे प्रशांत मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच झाला असून या वेळी भाजपनेतेजयंत - पगडे, माजी नगरसेवक अजय बहिरा, पनवेल महानगरपालिकेचे उपयुक्त वैभव विधाते, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, पोलीस आयुक्त विक्रम कदम आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात विविध गटांतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. त्यात आमदार महेश बालदी संस्थापक असलेल्या श्री गणेशोत्सव मंडळ उरण या मंडळास उत्कृष्ट गणेशमूर्ती गटात प्रथम क्रमांक पारितोषिक मिळाला मंडळाचे कौशिक शाह, मकरंद पोतदार,शैलेश समेळ,सागर घोसाळकर, कुणाल शिसोदिया यांनी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्विकारला.

श्री गणेशोत्सव मंडळाचे संस्थापक आमदार महेश बालदी, कार्याध्यक्ष भाजप उरण शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह, उपाध्यक्ष उद्योजक सुनील पेडणेकर, सेक्रेटरी संतोष ओटावकर व कार्यकारी सदस्य आहेत. श्री गणेशोत्सव मंडळ, स्वामी विवेकानंद चौक उरण या मंडळास ३८ वर्षे पूर्ण झाले असून यंदाचे ३९ वर्षे आहे. मंडळाच्या वतीने गणेश जयंतीपासून अनंत चतुर्थी पर्यन १० दिवस विविध करमणुकीचे, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम घेतले जातात. त्यात विशेष मुलांच्या शाळेला शालोपयोगी साहित्य, महिलांसाठी पाककला स्पर्धा, लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, रुग्णांना फळे वाटप, आदिवासी वाड्यांवर आदिवासींना डॉक्टरांच्या सल्यानुसार औषधे वाटप, लोकल कलाकारांना त्यांची कला सादर करण्यासाठी वाव देणे, आवाज प्रदूषण होवू नये त्याकडे लक्ष देणे, पर्यावरणाचा समतोल राहण्यासाठी मूर्ती विसर्जन न करता संवर्धन केले जाते.

दुसऱ्यावर्षी ती मूर्ती समुद्रात विसर्जित केली जाते. डी.जे.न वापरता पारंपारिक वाद्य वाजविली जातात. वर्षी मंडळास नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# वृद्धाश्रमात अल्पोपहार

## भाजप नेते नितीन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक तथा भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन जयराम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भानघर येथील करुणेश्वर ओल्ड एज केअर हाऊस येथे नाश्त्याचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन भाजपा उत्तर रायगड जिल्हा चिटणीस (ओबीसी मोर्चा) प्रसाद म्हात्रे यांच्या वतीने करण्यात आले होते. या वेळी भाजपा सोशल मीडिया संयोजक प्रसाद हनुमंते यांच्या प्रमुख उपस्थितीत नरेंद्र सोनवणे, चंद्रकांत पंडित सर, युवा मोर्चा सदस्य सद्दाम बागवान, रोहित म्हात्रे, अजय बलखंडे, माजीद बागवान, संतोष वर्तले, शुभम बेद, अमन बेद, आदित्य गायकवाड आदी उपस्थित होते.



## संपादकीय

# वेध बाप्पाचे...

१४ विद्या आणि ६४ कलांचा अधिपती असलेल्या गणपती बाप्पाचे येत्या बुधवारी गणेश चतुर्थीला घरोघरी तसेच सार्वजनिक ठिकाणी आगमन होणार आहे. या पार्श्वभूमीवर बाप्पाच्या स्वागताची जोरदार तयारी सुरू आहे. काहींच्या मूर्ती आधीच दाखल झाल्या असून सजावटीचे काम जोमाने चालू आहे, तर भाविकांकडून बाजारपेठेत विविध साहित्य खरेदीला उधाण आल्याचे चित्र आहे.

**भगवान शिवशंकर आणि माता पार्वतीचा पुत्र गणपती सर्वांचा लाडका बाप्पा म्हणून ओळखला जातो. गणरायाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोणतेही शुभकार्य आरंभ करताना श्री गणेशाची पूजा-अर्चा केली जाते, जेणेकरून हाती घेतलेले कार्य यशस्वीपणे पूर्णत्वास जावे. असा हा अग्रपूजेचा मान असलेला सुखकर्ता, दु:खहर्ता विविध नावांनी ओळखला जातो. त्याचा भाद्रपद महिन्यातील उत्सव प्रचंड लोकप्रिय आहे. सुरुवातीला गणेशोत्सव केवळ धार्मिक पद्धतीने साजरा होत असे. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळकांनी लोकांना एकत्र आणण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. जनजागृती आणि सामाजिक ऐक्यासाठी केलेल्या या प्रयोगाला उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला आणि मग बघता बघता आज गणेशोत्सव राज्य, देशाच्या सीमा पार करून साता समुद्रापार गेल्याचे पहावयास मिळते. कालानुरूप गेल्या अनेक वर्षांमध्ये गणेशोत्सवाचे स्वरूप बदलले असले तरी तो साजरा करण्यामागची श्रद्धा आणि भावना अद्यापही तसूभर कमी झालेली नाही. भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षाच्या विनायक चतुर्थीला गणपतीचे आगमन होत असते. कुणी दीड, कुणी पाच-सात, तर कुणी दहा दिवस यथाशक्ती बाप्पाला विराजमान करून त्याची सेवा करतात. मग सगळीकडे वातावरण चैतन्यमय होऊन विघ्नहर्त्याचा गजर ऐकायला मिळतो. नोकरी-धंद्यामुळे विखुरलेली कुटुंब यानिमित्ताने एकत्र येतात. ज्येष्ठ, प्रौढ, तरुण, बच्चेकंपनी एकत्र आल्याने घराला खऱ्या अर्थाने या दिवसांमध्ये घरपण प्राप्त होते. नातेवाईक, आप्तेष्ट, सहकारी, मित्रमंडळीही दर्शन, आरती, प्रसादाला येतात. त्यामुळे आनंद द्विगुणित होतो. गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. अनेक लोक यामध्ये सहभागी होतात. असा हा आनंददायी उत्सव दोन दिवसांवर आल्याने सर्वत्र त्याचीच लगबग सध्या दिसून येते. गणरायाच्या साहित्याने बाजारपेठा सजल्या असून आकर्षक मखरे, विद्युत माळा, तोरणे लक्ष वेधून घेत आहेत. फळे, फुले, पूजेच्या सामानालाही मागणी आहे. गणेशमूर्ती कार्यशाळांमध्ये कारागीर मूर्तीवर अखेरचा हात फिरवण्यात मग्न आहेत. सार्वजनिक मंडळांच्या मूर्ती काही दिवस आधीच मंडपात दाखल झाल्या आहेत. कोकणात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. चाकरमानी आवर्जून गणपतीसाठी आपल्या मूळ गावी जातात. त्यांची वाहने अन् पावले आता गावाकडे वळली आहेत. त्या दृष्टीने विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. एसटी तसेच रेल्वे विभागाकडून जादा गाड्या सोडण्यात आल्या आहेत. राजकीय पक्षांकडूनही बसेसचे नियोजन केले गेले आहे. सर्वाधिक वाहतुकीच्या मुंबई-गोवा महामार्गावर प्रशासकीय आणि पोलीस यंत्रणेने खास तयारी केली असून विविध सुविधा गणेशभक्तांना उपलब्ध करून दिल्या आहेत. एकूणच सगळ्यांना गणरायाच्या आगमनाचे वेध लागले आहेत. दोन दिवसांनी बाप्पा विराजमान होतील. तेव्हापासून पुढचे दिवस आबालवृद्धांसाठी अतिशय हर्षोल्हासाचे असणार आहेत.**

# कर्जतमध्ये खड्ड्यांमुळे रस्त्यांची चाळण



श्रीगणेशोत्सव म्हणजे कोकणातील महत्वाचा सण. मुंबईत असलेला कोकणी माणसाला या सणाची अगदी पावसाळा सुरु झाल्यापासून ओढ असते. मग सर्वात पहिले रेल्वेचे आरक्षण मिळविण्यासाठी धडपड असते. ते मिळाले नाही तर मग एसटीच्या आरक्षणाकडे मोर्चा वळवला जातो. यातील काहीच झाले नाही तर खासगी वाहनाचा पर्याय शोधला जातो. हे जरी असले तरी यंदा तरी बाप्पा पावशील का? बिनखड्यांचे रस्ते आम्हाला दावशील का? असे म्हणण्याची पाळी आली आहे.

कर्जत तालुक्यातील बहुतांश रस्त्यांवर खड्डे पडले असून चाकरमानी दररोज या खड्ड्यांचा सामना करीत आपल्या रोजी रोटीला जात आहेत. गणेशोत्सव चार दिवसांवर आला आहे, मात्र या परिस्थितीत बदल नाही. त्यामुळे गणरायालाही खड्ड्यांचे विघ्न दूर करीत जावे लागणार आहे. कर्जत शहरातसुद्धा खड्डे पडले असून त्यामुळे दररोज खड्डे चुकविण्याच्या नादात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. तसेच अपघातालाही निमंत्रण मिळते.

कर्जत-मुरबाड या मुख्य रस्त्यावर कर्जत शहरात प्रवेश करतानाच चार फाटा, रेल्वे पूल, प्रति आळंदी पंढरपूर, श्रीराम पूल येथे खड्ड्यांचे साम्राज्य आहे. तालुक्याचा सुमारे नव्वद टक्के भाग पूर्वेकडे असल्याने या रस्त्यावरूनच बहुतांश जनता जा-ये करीत असते. खड्ड्यांमुळे अपघात होतात तसेच दररोज वाहतूक कोंडी होत असते. कर्जत -कोंदिवडे रस्त्यावरदेखील खड्डेच खड्डे आहेत. नेरळ-माथेरान घाट रस्त्यावर सुद्धा खड्डे आहेत. तालुक्याच्या ग्रामीण भागात अनेक रस्त्यांवर खड्डे असल्याने आंदोलने, उपोषणे करण्याची वेळ येते.

कर्जत-पळसदरी-खोपोली मार्गावर खड्डे असल्याने तेथे अनेक अपघात झाले आहेत. काहींना आपला जीव गमवावा लागला आहे. हा रस्ता अद्याप पूर्ण झाला नाही. कुठे जमीन मालकांना मोबदला मिळाला नाही म्हणून तर कुठे वन विभागाची जमीन असल्याने रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत राहिले आहे. नेरळ विभागातही अनेक रस्त्यांवर खड्डे आहेत. आदिवासी भागातील रस्त्यांवरसुद्धा खड्डे आहेत. कितीही अर्ज विनंत्या केल्या तरी ठोस उपाय होत नाही. तात्पुरती मलमपट्टी करून समजूत काढली जाते. अनेक रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. अगदी दुचाकी स्वारालाही खड्डे वाचवताना नागमोडी वळणे घ्यावी लागतात. काही जणांचे म्हणणे असे आहे की, दुचाकीस्वाराला वाहन चालविण्याचा परवाना देताना रस्त्यावरील खड्ड्यांमधून गाडी चालविण्याची चाचणी घ्यावी. म्हणजे आयुष्यात त्याला कधीही अडचण येणार नाही. अशी परिस्थिती जिल्ह्यातील अनेक रस्त्यांची झाली आहे.

**खबरबात**
**विजय मांडे**

श्रीराम पुलाच्या परिसरात शिवसेनेच्या वतीने माजी नगरसेवक संकेत भासे यांनी पुढाकार घेऊन खड्डे बुझविले. पुन्हा खड्डे पडले. तेसुद्धा भरले, मात्र मुसळधार पावसापुढे काहीच चालेना जैसे थे परिस्थिती होते. त्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या विधानसभा अध्यक्ष किरण ठाकरे यांनी खड्डे बुझविण्याची मोहीम हाती घेतली. त्यांनी स्वखर्चाने खड्डे भरले. काही ठिकाणी अगदी प्लेव्हर ब्लॉकचा वापर केला, पण मुसळधार पावसाने थोड्या दिवसात पुन्हा खड्डे पडले. काही ठिकाणी काँक्रिटचे रस्ते आहेत. तोच रस्ता पुढे डांबरी केला आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी डांबरीकरण आहे. तो रस्ता फुटला आहे. मोठ मोठे खड्डे पडले आहेत. तालुक्यातील अनेक पुलांवर खड्डेच खड्डे आहेत. पुलाला जोडणारे रस्ते उंच सखल असल्याने पावसाळ्यातच नव्हे तर एरव्हीसुद्धा वाहनचालकांना त्रास होतो. चांगल्या प्रकारे खड्डे भरल्यास गणेशोत्सवपूर्वी गणरायाचाही प्रवास सुखकर होईल.



दुरून प्रवास करीत असताना कर्जत तालुक्यात येताना एखाद्याला झोप लागली आणि त्याचे वाहन कर्जत तालुक्याच्या प्रवेश द्वारांजवळ आल्यावर खड्ड्यांमुळे जाग येते. म्हणजे समजावे कर्जत तालुक्यात प्रवेश होतोय. खरे तर पूर्वी डांबरी रस्ते होते. तेंव्हा रस्ते तयार करण्याची क्वालिटी चांगली होती कारण तेंव्हाही पाऊस पडतच होता. आता सिमेंट काँक्रिटीकरणावर भर दिला जातो. कर्जत नगरपरिषदेमध्ये काँक्रिटी करणाने रस्ते केले. ते रस्ते अजूनही चांगल्या अवस्थेत आहे, मात्र कधी जलवाहिनी दुरुस्त करण्यासाठी खोडले असतील तेथे ते खराब अवस्थेत आहेत. नंतर ज्या रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यात आले त्यातील अनेक रस्त्यांची क्वालिटी खराब झाली आहे. ते रस्ते परत करण्याची वेळ आली आहे. काही काँक्रिट रस्ते अर्धा किलोमीटर चांगले त्यानंतर पुढे पाव किलोमिटर खराब अशी अवस्था आहे. तोच ठेकेदार तेच अधिकारी तरीही ही परिस्थिती. याचे कारण शोधणे गरजेचे आहे.

रमेश कदम यांनी गेले दोन महिने अनेक खड्ड्यांमध्ये ठाण मांडून आंदोलन केले. तरी काहीच उपयोग झाला नाही. अखेर त्यांना उपोषणाचे हत्यार उचलावे लागले. त्यामुळे सर्व अधिकाऱ्यांना जाग आली आणि त्यांनी खड्डे भरण्याचे आश्वासन दिले. म्हणजे आंदोलन केल्याशिवाय पर्याय नाही हे खरे...!

## बदलते तंत्रज्ञान

# रिचार्ज न करता मेसेज जाणारा आलाय नवा ॲप

जगभरात सर्वाधिक वापरला जाणारा whats Appआता एका नव्या ॲपसमोर मोठ्या आव्हानात सापडू शकतो. कारण ट्विटरचे सहसंस्थापक जॅक डोर्सी बाजारात एक भन्नाट इन्स्टंट मेसेजिंग ॲप घेऊन येत आहेत. या ॲपचं नाव आहे Bitchat आणि त्याची सर्वात मोठी खासियत म्हणजे हे ॲप इंटरनेटशिवायसुद्धा काम करतं.




Bitchat मेसेजिंगसाठी ब्लूटूथ मेश नेटवर्कचा वापर करतं, म्हणजेच इंटरनेट नसलं तरीही तुम्ही आपल्या मित्र-परिवाराशी जोडलेले राहू शकता. हा कम्युनिकेशनचा एक अनोखा प्रकार आहे, जो हाय-टेक एन्क्रिप्शन अंतर्गत पूर्ण सुरक्षित असेल. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या ॲपमधून मेसेजेस जवळपास ३०० मीटरच्या परिसरात ट्रान्समिट केले जाऊ शकतात, तर साधारण ब्लूटूथची मर्यादा फक्त १०० मीटर असते.

यात तुम्ही **ट्विटर**प्रमाणेच mention टाकू शकता, वेगवेगळ्या टॉपिक-बेस्ड चॅटरूम्स तयार करू शकता आणि आवडलेले मेसेजेस Favouritesमध्ये जतनही करू शकता. डोर्सी यांनी याचा **टेस्ट फ्लाइट** वर्जन **ॲपल** युजर्ससाठी आधीच उपलब्ध करून दिलं आहे.

Bitchat इंटरनेटवर अवलंबून नसल्यामुळे तुमच्या डेटाचा गैरवापर होण्याची भीतीच नाही, कारण सर्व्हरवर कोणतीही माहिती साठवली जात नाही. WhatsApp प्रमाणे ॲड्स, चॅनेल्स किंवा इतर व्यावसायिक ॲक्टिव्हिटी इथे नाहीत, त्यामुळे युजर्सना खऱ्या अर्थाने प्रायव्हसी मिळेल असं मानलं जातं.

डोर्सी सतत नवे प्रयोग करत आहेत. त्यांनी आधी Bluesky नावाचं मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्म आणलं, तसेच ते Bitcoin आणि Decentralized Technology ला नेहमीच सपोर्ट करत आहेत. आता Bitchat च्या माध्यमातून ते पुन्हा एकदा युजर्सना नवा अनुभव देणार आहेत.

सध्या हे ॲप बीटा टेस्टिंग स्टेजमध्ये आहे आणि केवळ काही ळजड युजर्ससाठी टेस्ट फ्लाइट वर उपलब्ध आहे. लाँच होताच १०,००० युजर्सची मर्यादा क्षणात पूर्ण झाली. जॅक डोर्सी यांनी याचे व्हाईटपेपर व बीटा इनवाइट्स द (पूर्वी ट्विटर) वर शेअर केले आहेत.

# संगीतकार अशोक पत्की



## निमित्त

गेली पन्नास वर्षे मराठी रंगभूमीवर गीतकार, संगीतकार म्हणून प्रवास करणारे अशोक पत्की. वैभवशाली संगीताचा वारसा जपणारा हा संगीतकार, जो पिढ्यान्‌पिढ्यांना आपला हक्काचा वाटला. संगीतातले विविध प्रकार ताकदीने हाताळून नाटकाचा आविष्कार रंगविण्याचे जबरदस्त कसब असणारा हा रंगप्रवासीच!

२५ ऑगस्ट १९४१ रोजी त्यांचा जन्म झाला त्यांचे वडील गिरणी कामगार. मध्यमवर्गीय कुटुंब. खेतवाडीतल्या चाळीत घर. गोवा हिंदू असोसिएशनचा जमाना. संगीत नाटकासाठी पेटीवाल्याचा शोध सुरू होता. पंडित जितेंद्र अभिषेकींसोबत काम करण्याची संधी त्यातूनच त्यांना मिळाली. संगीत मत्स्यगंधापासून त्यांचे आणि पंडितजींचे सूर जुळले ते शेवटपर्यंत.

केवळ नाटकांचे संगीत, गाणं यापुरता त्यांचा वावर नाही तर त्या सोबत भावगीतांचे लेखन, चित्रपट, मालिका, जाहिराती, जिंगल्स, शीर्षकगीते असे अनेक प्रकार त्यांनी ताकदीने साकार केलेत. अगदी गर्दीतला पेटीवादक ते चित्रपट संगीतकार असा त्यांचा प्रवास. जो प्रत्येक वळणावर कल्पकता व कलात्मकता यांचा साक्षीदार ठरलाय. मराठी नाटकात संगीत रंगभूमीपासून ते गद्य नाटकापर्यंत तसेच प्रायोगिक नाटकांपासून ते महानाट्यापर्यंतचा त्यांचा आवाका थक्क करून सोडणारा तसेच नव्या दिशा शोधणारा आहे

मोरूची मावशी' हे आचार्य अत्रे यांचे नाटक. हे धम्माल विनोदी नाटक दोनदा रंगभूमीवर आलं. त्यावर 'अत्रे पिक्चर्स' तर्फे चित्रपटही निघाला. पुनरुज्जीवनात १ जानेवारी १९८५ या दिवशी 'सुयोग' तर्फे शुभारंभ झाला. दिलीप कोल्हटकर यांचे दिग्दर्शन आणि संगीत दिग्दर्शन अशोक पत्की! जे तुफान गाजले. त्यातील विजय चव्हाण यांच्या 'टांग टिंग टिंगा'ला चक्क वन्समोअर मिळायचे. 'सुयोग' या नाट्यसंस्थेला या नाटकाने ओळख मिळाली.

'सुयोग'चे नंतरचे अत्रे यांचेच 'ब्रह्मचारी' नाटकही रंगभूमीवर आले. त्यातलाही वेगळेपणा रसिकांच्या नजरेत भरला. वर्षा उसगावकर आणि प्रशांत दामले या दोघांनी नाटक गाजविले. जुनी नाटके नव्या संचात आणि बदललेल्या वातावरणात सादर करतांना संगीतात, गाण्यात जे काही बदल करायचे ते पडद्यामागे त्यांनी केलेले. हे वेगळेपण असल्याने रसिकांचीही चांगली दाद मिळाली.

'सुयोग'चे सुधीर भट आणि गोपाळ अलगेरी यांच्याप्रमाणेच प्रशांत दामले यांच्याशीही चांगले 'स्वरसंबंध' त्यांचे जुळले गेलेत. आजही 'सारखं काहीतरी होतंय' यातही प्रशांत दामलेला गाणं म्हणायला लावलय आणि ताल धरत रसिक नाट्यगृहाबाहेर पडतात. 'माझ्या गाण्याचं शंभर टक्के श्रेय हे संगीतकार अशोक पत्की यांना आहे. त्याच्यामुळेच सारं काही शक्य होतं! असं प्रशांत दामले म्हणुनच वारंवार म्हणतात. अशोक पत्की यांनी या प्रदीर्घकाळात म्हणजे चक्क १९७२ पासून २५२ नाटकांचे पार्श्वसंगीत, ५०० पेक्षा जादा भावगीते, ३०० मालिकांची शीर्षकगीते, साडेपाच हजारावर जिंगल्स असा आविष्कार केलाय. जो चमत्कारच म्हणावा लागेल. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सकाळचा नाश्ता टाळणे अपायकारक

सकाळी कामाला उशीर होऊ नये म्हणून लोक अनेकदा नाश्ता वगळतात. बऱ्याच वेळा जास्त वेळ झोपण्यासाठी आपण सकाळचा नाश्ता करणे टाळतो. अनेकदा लोकांना असे वाटते की, सकाळचा नाश्ता वगळण्याने कोणतेही विशेष नुकसान होत नाही आणि जरी असे झाले तरी दुपारच्या जेवणात थोडे अधिक खाल्ल्याने आपण ही कमतरता दूर करू शकतो. परंतु, जेव्हा तुम्ही महिनाभर ते सतत वगळले तर काय होते? हे जाणून घेऊयात...



बंगळुरूमधील फोर्टिस हॉस्पिटल्सच्या सल्लागार गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. प्रणव होन्नावरा श्रीनिवासन यांनी या संदर्भात बोलताना सविस्तर माहिती दिली आहे. डॉ. श्रीनिवासन यांनी अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित केलेल्या संशोधनाचा हवाला दिला आहे, ज्यात सूचित केले आहे की, नियमित नाश्ता केल्याने पचनाची समस्या नाहीशी होते. याउलट नाश्ता न केल्यानं टाइप २ मधुमेहाचा धोका वाढतो.

डॉ. श्रीनिवासन म्हणतात, अनेक अभ्यासांनी दीर्घकालीन नाश्ता वगळण्याशी संबंधित संभाव्य दीर्घकालीन आरोग्य धोके ओळखले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत.

**१. मेटाबॉलिक सिंड्रोम :** अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित मेटा-विश्लेषणात असे आढळून आले की, नाश्ता वगळणे हे मेटाबॉलिक सिंड्रोमच्या उच्च जोखमीशी संबंधित आहे, ज्यामुळे हृदयरोग, स्ट्रोक आणि टाइप २ मधुमेहाचा धोका वाढतो.

**२. हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोग :** संशोधन असे सूचित करते की, जे लोक नाश्ता वगळतात त्यांना हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकसारख्या हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी घटनांचा धोका जास्त असतो.

**३. टाईप २ मधुमेह :** सार्वजनिक आरोग्य पोषणमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासासह अनेक अभ्यासांनी न्याहारी वगळण्याला टाइप-२ मधुमेह होण्याच्या जोखमीशी जोडले आहे. हा अनियमित खाण्याच्या पद्धतींमुळे होणारा परिणाम आहे.

**४. पौष्टिक कमतरता** : नाश्ता वगळल्याने जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबर यांसारख्या आवश्यक पोषक घटकांचे अपुरे सेवन होऊ शकते, ज्याचे एकूण आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात.

# कशेडी घाटात बसने घेतला पेट

## बससह प्रवाशांचे सामान खाक; सुदैवाने जीवितहानी नाही

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटातील भुयारी मार्गापर्यंतच्या नवीन रस्त्यावर बोरिवलीहून मालवणपर्यंत जाणाऱ्या खाजगी बसचा टायर गरम होऊन फुटला व पेट घेतल्याने लागलेल्या आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली. रविवारी पहाटे २ वाजताच्या सुमारास पोलादपूर तालुक्यातील भोगाव गावाच्या हद्दीत ही बस प्रवाशांच्या सामानासह जळल्याची घटना घडली.

पोलादपूर पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार चालक सचिन रघुनाथ लोके (वय ३०) हा मनाली टूर्स अँड ट्रॅव्हल्सची खाजगी बस घेऊन बोरिवली ते मालवण असा जात असता कशेडी घाटातील भोगाव गावाच्या हद्दीत भुयारी मार्गातील रस्त्याजवळ आला असताना बसच्या टायरला अचानक आग लागली.



यावेळी प्रसंगावधान दाखवून चालकाने बस थांबविल्याने प्रवाशांना बसमधून बाहेर पडता आले. याचदरम्यान बसला आगीच्या ज्वाळांनी वेढले आणि संपूर्ण बस प्रवाशांच्या सामानासह भस्मसात झाली. मात्र, या खासगी बसमधील एकूण ४४ प्रवासी २ वाहक व १ क्लीनर ४७ जण बचावले.

या घटनेची माहिती समजताच पोलादपूर पोलिसांनी तात्काळ खेड व महाड नगर परिषद येथील अग्निशमन यंत्रणांना पाचारण करून आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र, बस संपूर्ण पेटल्याने आगीत जळून खाक झाल्यावर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. बस पेटल्यानंतर दोन्ही बाजूने वाहनांची दाटी काही काळ निर्माण झाली होती. वाहतूक पूर्वपदावर आल्यानंतर पोलिसांनी या बसमधील प्रवाशांना मालवण दिशेने जाणाऱ्या वाहनांमध्ये बसवून आपआपल्या गावी रवाना करण्याची सोय केली.या अपघाताची नोंद पोलादपूर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याप्रकरणी हवालदार रंजेश पवार हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपास करीत आहेत.

# मुरूड नगर परिषदेची स्टॉलधारकांवर धडक कारवाई

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड समुद्र किनाऱ्याजवळ स्थानिक स्टॉलधारक गोपाल शर्मा यांची पाणीपुरीची हातगाडी असुन या हातगाडीवर असंख्य स्थानिक व पर्यटक पाणीपुरी खाण्यासाठी येत असतात, परंतु या स्टॉल ठिकाणी नेहमी अस्वच्छता पसरलेली असते. मुरुड-जंजिरा नगर परिषदेच्या वतीने सदर पाणीपुरी स्टॉल धारक गोपाल शर्मावर कारवाई करुन त्याची हातगाडी जप्त करण्यात आली

गोपाल शर्मा व त्याचा कामगार हातगाडीवरील असलेली भांडी व साधने त्याच स्टॉलजवळ बिंधास्तपणे उघडयावर धुणे,त्या सांडपाण्याची अयोग्य विल्हेवाट न करणे यामुळे या परिसरात दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होईल याबाबत नगर परिषदेकडे वारंवार



तक्रारी प्राप्त झाल्याने तसेच हातगाडी जवळ ग्राहकांसाठी बसण्याची सोय रस्त्यालगतच केल्याने सार्वजनिक वाहतूक व रहदारीस अडथळा निर्माण होत असल्याने मुरुड-जंजिरा नगर परिषदेच्या वतीने सदर पाणीपुरी स्टॉलधारक गोपाल शर्मा वर कारवाई करुन त्याची हातगाडी जप्त करण्यात आली.

पाणीपुरी व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत असून मोठी गर्दी या दुकानात नेहमीच पहावयास मिळत असते.मुरुड समुद्र किनारी स्थानिक लोकांचे ४५पेक्षा जास्त व्यवसाय असून येथे पर्यटक व स्थानिक नागरिक याना सुविधा देत असतात, परंतु आता मुख्याधिकारी स्वतः पाहणी करून कार्यवाही करण्याचे संकेत दिल्याने प्रत्येक स्टॉल धारकास स्वच्छेतेचा अवलंब करणे आवश्यक बनले आहे.

यावेळी मुरुड नगर परिषदेकडून संबंधित स्टॉलधारकाकडून दंड वसुल करुन व याप्रकारची पुनरावृत्ती होणार नाही. याबाबत हमीपत्र लिहून घेण्यात आले. त्यानंतरच स्टॉलधारकास त्यांची हातगाडी परत करण्यात आली आहे.

# माथेरानमध्ये गणेश पूजन साहित्याचे वाटप

## भाविकांसाठी माथेरान भाजपचा स्तुत्य उपक्रम

**माथेरान : बातमीदार**

माथेरान भारतीय जनता पार्टीच्या वतीने मागील दहा वर्षांपासून शहरातील ज्या गणेशभक्तांकडे श्रीगणेशाचे आगमन होणार असते अशा गणेशभक्तांना गणेश पूजन साहित्याचे वाटप करण्यात येते. भारतीय जनता पार्टी माथेरान शहर अध्यक्ष प्रविण सकपाळ, उपाध्यक्ष किरण चौधरी यांच्या संकल्पनेतून या स्तुत्य उपक्रमाची सुरवात दहा वर्षांपूर्वी झाली.

मुख्य बाजारपेठेतील श्रीराम चौकातील डिवाईन



कलेक्शन येथे हा स्तुत्य उपक्रम रविवारी (दि.२४) रोजी सकाळी करण्यात आला.

सर्व गणेशभक्तांनी पूजा साहित्य घेण्यास गर्दी केली होती.यावेळी शहर अध्यक्ष प्रविण सकपाळ,उपाध्यक्ष किरण चौधरी,माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी,चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे,संदीप कदम, राकेश चौधरी,व्यापारी मंडळ अध्यक्ष राजेश चौधरी, ज्येष्ठ कार्यकर्ते अरविंद शेलार तसेच सर्व महिला पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# डॉ.श्री. धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने रोह्यात स्वच्छता अभियान

**रोहा : प्रतिनिधी**

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवंदडा यांच्या वतीने पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली रवीवारी रोहे शहरातील प्रमुख व उपरस्त्यांची तसेच रोहा शहराला जोडणा-या रस्त्यांची साफसफाई करुन स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवंदडा यांच्या वतीने रविवार रोहा नगरपरिषद हद्दीतील संपूर्ण रस्ते व त्यांची स्वच्छता करण्यात आली शहरातील संपूर्ण रस्ते




शहराला जोडणा-या रस्ते, बसस्थानक येथे स्वच्छ करण्यात आले.

या स्वच्छता अभियानामध्ये श्री सदस्यांचा व इतर व्यक्तीचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला एकूण ४०३ श्री सदस्य उपस्थित होते. एकूण २० सरकारी पदाधिकारी व कर्मचारी व इतर २ सदस्य उपस्थित होते.

या स्वच्छता अभियानाच्या उपक्रमाला रोहा नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष मयूर दिवेकर, रोहा नगरपरिषदेचे स्वच्छता निरीक्षक मनोज पूळेकर, नगरपरिषद अधिकारी सुधीर भगत, श्रीनिवास पाटील, सामाजिक कार्यकर्ते बिलाल मोर्बेकर व इतर कर्मचारी उपस्थित होते. माजी उपनगराध्यक्ष मयूर दिवेकर यांनी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रतिष्ठानातर्फे आत्तापर्यंत राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियान वृक्ष संवर्धन व संगोपन तसेच विसर्जनाच्या काळात निर्माल्या गोळा करणे

या बद्दल प्रतिष्ठानाचे कौतुक केले. रोहा नगरपरिषदेचे स्वच्छता निरीक्षक मनोज पूळेकर यांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतूक केले.

# माणगावचे पथदिवे लुकलुकत्या काजव्याप्रमाणे अंधारात गायब


**माणगाव : बातमीदार**

माणगांव नगरपंचायतीच्या हद्दीतील अनेक भागात पथदिवे लागत नसल्याच्या तक्रारी वाढल्या असून सध्याच्या पावसाळ्यात बाहेर फिरताना नागरिकांना एका हातात विजेरी (बॅटरी) तर दुसऱ्या हातात छत्री घेऊन पायाखाली रस्त्यावरील खड्डे, विंचुकाटा, साप, यांचा अडथळा पार करून डोळ्यांना ताण देत सावध चालावे लागते. गणेशोत्सव ऐन तोंडावर नगरपंचायत हद्दीतील अनेक पथदिवे लुकलुकत्या काजव्यासम अंधारात होतात गायब! असे वास्तव चित्र आहे.

याबाबत माहिती घेतली असता पंचायतीकडेच पथ दिव्यांची पंचायत झाल्याचे कारण पुढे येते. जवळपास दोनशे दिव्यांची मागणी असून पुरवठा प्रश्नांकित आहे.

अनेक अंतर्गत रस्त्यावर मुसळधार पावसाचे पाणी साचते मग अंधारात दुष्काळात तेरावा अशी कठीण अवस्था नागरिकांचे अनुभवास येते. अडीच कोटींचे सोलार पथदिवे हायमास्ट बसतील तेंव्हा बसतील तोपर्यंत बंद झाले ते चालु करा अस लोक बोलतात.

दि.२७ ऑगस्टपासून श्री गणेशोत्सवाला सुरुवात होणार निदान त्या आधी या पथदिव्यांचा उजेड पडु दे रे बाप्पा! संबधीत नगर पंचायत दिवाबत्ती विभागातून यावर तात्काळ उपाययोजना अपेक्षीत असुन कमीत कमी सण तरी आनंदाने प्रकाशमान वातावरणात साजरा व्हावा एवढीच माफक अपेक्षा नगरपंचायतीच्या पथदिवे करदात्या माणगांवकरांकडुन व्यक्त होत आहे



# श्रीवर्धन बाजारपेठेत चायनीज हॉटेलवाल्यांची किचन रस्त्यावर

**श्रीवर्धन : बातमीदार**

आत्ताच्या नवीन पिढीमध्ये चायनीज खाण्याचे वेड तरुणाईला लागलेले पाहायला मिळते. अनेक तरुण-तरुणी चायनीज हॉटेल मधून जेवण पार्सल नेतात किंवा त्या ठिकाणी चायनीज राईस, नूडल्स व विविध मिळणारे पदार्थ खाताना दिसून येतात मात्र. श्रीवर्धन बाजारपेठेत असलेल्या सर्वच चायनीज वाल्यांनी आपली किचन रस्त्यावर ठेवल्यामुळे त्या ठिकाणहून जाणाऱ्या पादचाऱ्यांना मसाल्याचा ठसका लागण्याचा त्रास होतो. अनेक जणांचे डोळे देखील चुरचुरतात.

नगर परिषदेच्या नियमानुसार हॉटेलमध्ये किचन हे आतल्या बाजूलाच असावे लागते.



परंतु हे सर्व नियम धाब्यावरती बसवून चायनीज रेस्टॉरंट वाले खुलेआम पणे पुढच्या भागात किचन चालवत असलेले दिसून येतात.

श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाने अशा प्रकारे बाहेर किचन ठेवणाऱ्यांवरती कडक कारवाई करावी व हॉटेलच्या पुढील भागात किचन ठेवण्यास मनाई करावी. अशी मागणी शहरातील नागरिकांमधून होत आहे.

# वरसे ग्रामपंचायतीच्या तंटामुक्ती अध्यक्षपदी तुकाराम पाटील

**रोहा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील प्रतिष्ठित असलेल्या ग्रुप ग्रामपंचायत वरसेच्या ग्रामसभेत तंटामुक्ती अध्यक्षपदी तुकाराम रघुनाथ पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच रामाशेठ म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात ही ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती.

निवडीनंतर तुकाराम पाटील यांचे राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष मधुकर पाटील, माजी सभापती हेमंत कांबळे, सरपंच रामाशेठ म्हात्रे, उपसरपंच मयुरी पडवळ, सदस्य नरेश पाटील, अमित



मोहिते, मनोहर सुर्वे, शांतीशिल तांबे, उतेश कांबळे, तुषार शिंदे, अपर्णा पाटील, मीनल देशमुख, माजी तंटामुक्ती अध्यक्ष मनोहर सकपाळ, गणेश शिवलकर, सदानंद पडवळ, रामशेठ नाकती, गुणाजी पोटफोडे, अनिल बामुगडे, समीर देवरे, जितेंद्र गायकवाड, योगेश राऊत, आदींनी अभिनंदन केले.

# नेरळच्या विद्या विकास मंदिरमध्ये मातृदिन साजरा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ येथील विद्या विकास मंडळ संचालित विद्या विकास मंदिर या शाळेत मातृदिनाचा समारंभ शाळेच्या सभागृहात पार पडला. या वेळी विद्यार्थ्यांना संस्कारक्षम मार्गदर्शन करण्यात आले.

शोभा गोरे व डॉ. अर्चना शिरसाठ या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या तसेच प्राथमिक विभाग शालेय समिती अध्यक्ष अमित जोगळेकर, प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका विनया काकडे, इंग्रजी माध्यम विभाग मुख्याध्यापिका स्नेहा म्हसे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राहुल कालेकर, उपाध्यक्षा सपना राणे, शिक्षक प्रतिनिधी अनिता हिरे, सदस्य वर्षा कराळे, पायल जाधव आशिष चव्हाण आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात संपदा फणसे यांच्या सुंदर आवाजात म्हटलेल्या एकात्मता मंत्राने झाली. या कार्यक्रमांतर्गत भारतीय संस्कृती व संस्कार यांचे महत्व विविध कार्यक्रमातून दर्शविण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या मातेप्रती असलेल्या भावना व प्रेम आपल्या मनोगतातून व्यक्त केले. प्रमुख पाहुण्या शोभा गोरे व डॉ. अर्चना शिरसाठ यांनी आपल्या मनोगतातून आई व मुलांमधील नाते स्पष्ट केले. शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा सपना राणे तसेच प्रियदर्शिनी मोडक व रसिका कर्णिक यांनीही मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी आपल्या मातांचे औक्षण करून त्यांना वंदन केले व त्यांचा आशीर्वाद घेतला. तसेच त्या नंतर सर्वांनी आई व मुलांच्या खेळांचा आनंद घेतला. गाण्यांच्या तालावर नृत्य व मनोरंजक खेळ घेऊन विजेत्यांना पारितोषिक दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना पाटील यांनी केले



# आगामी गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद अनुषंगाने खालापूर पोलीस ठाण्यात बैठक

**चौक : प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सव व ईद ए मिलाद अनुषंगाने खालापूर पोलीस स्टेशन येथे शांतता कमिटीची, मोहल्ला समिती व गणेश मंडळांची बैठक आयोजित करण्यात आली होती, यावेळी या सणांच्या निमित्ताने योग्य त्या सूचना उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहुल यांनी दिल्या. खालापूर पोलीस ठाणे हद्दीतील शांतता कमिटी सदस्य, मंडळांचे प्रमुख व मोहल्ला समिती सदस्य उपस्थित होते.

सार्वजनिक गणोशोत्सवाची पुर्व परवानगी पोलीस ठाणेकडुन घेणे आवश्यक आहे, स्थानिक प्रशासन ग्रामपंचायत यांचा नाहरकत दाखला घेणे,तहसिलदार यांच्या कडून मिरवणुक परवानगी घ्यावी अशी



सूचना देण्यात आली. पोलीस ठाणेची ऑनलाईन गणेशोत्सव परवानगी www.mhpolice.maharashtra.gov.in या वेबसाईटव्दारे अर्ज करावा. आपले सरकार या साईड वर जावुन स्पिकर परवानगी घेण्यात यावी. गणेशोत्सवासाठी तयार केलेले मंडप व्यवस्थीत व मजबुत असावे जेणेकरुन ते पावसामध्ये टिकेल तसेच मंडप ज्या ठिकाणी बांधायचे आहे ती जागा सार्वजनिक किंवा खाजगी असल्यास त्याप्रमाणे परवानगी घ्यावी, पण वादग्रस्त जागेवर परवानगी देण्यात येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले. मंडप व कमानी उभारताना वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही व अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावी.गणेश मुर्तीच्या सुरक्षिततेची जबाबदारी मंडळाची आहे. मुर्तीचे सुरक्षेसाठी २४ तास स्वयंसेवक नेमण्यात यावेत. मुर्तीच्या ठिकाणी तसेच मंडपामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत.

मंडपाच्या ठिकाणी केलेली लाईटची सोय व्यवस्थीत असावी. विदयुत महामंडळाकडुन कायदेशीर लाईट मिटर घ्यावे. धार्मिक भावना दुखावतील असे देखावे नसावेत. तसेच आक्षेपार्ह बॅनर, मजकुर छापु नयेत. सामाजिक संदेश देणारे देखावे असावेत. दर्शनाकरीता मुर्तीजवळ कोणी जाणार नाही या करीता योग्य त्या अंतरावर पार्टेशियन बॅरकेट लावावे. दर्शनासाठी स्त्री, पुरुषांची वेगवेगळी रांग करावी. श्रीच्या सजावटीचे बाजुस समई, निरंजन, अगरबत्ती ठेवताना सजावटीला काही धोकानिर्माण होवुन आग लागणार नाही याची दक्षता आयोजकांनी घ्यावी.

उत्सवाकरीता वर्गणी/देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्विकार करावा परंतु घरोघरी जावुन जबरदस्तीने वर्गणी मागणेस मनाई आहे.विसर्जन मिरवणुकीचे वेळी वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी, मिरवणुकीदरम्यान आक्षेपार्ह घोषणाबाजी,गाणे वाजविणे,अश्लिल नृत्य करणे अशी कृत्य होणार नाही याची दक्षता आयोजकांनी घ्यावी. मिरवणुकीमध्ये किंवा दर्शनाचे वेळी महिलांची छेडछाड होणार नाही याची दक्षता घ्यावी.

ध्वनी प्रदुषणासंदर्भातील नियमांचे व तरतुदींचे पालन करण्यात यावे. गर्दीचे कार्यक्रम न करता सामाजिक अंतर राखुन आरोग्यविषयक उपक्रम,शिबीरे घ्यावीत. रक्तदान, वैदयकिय शिबीर तसेच कोरोना, मलेरिया, डेंग्यु इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करावीश्री.ची मिरवणुक मशिदीसमोरुन जात असाताना वादय जोरात वाजविणे गुलाल उधळणे, मशिदींसमोरुन मिरवणुक रेंगाळत ठेवणे, नमाज ध्वनिक्षेपक लावणे यासारखे प्रकार होणार नाहीत याची दक्षता घेणे.

# खारघर, कामोठ्यात रस्ते दुरुस्तीला वेग

## पनवेल महापालिका आयुक्तांकडून बांधकाम विभागाला सूचना





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेतर्फे खारघर व कामोठे प्रभागातील रस्ते दुरुस्तीच्या कामांना मोठ्या प्रमाणावर सुरूवात झाली आहे. येऊ घातलेल्या सणांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी बांधकाम विभागाला वेगाने कामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

महापालिका आयुक्तांनी बांधकाम विभागाला तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्यानंतर खारघर व कामोठे शहरातील प्रमुख रस्त्यांवर खड्डे बुजविणे व डांबरीकरणास सुरूवात झाली आहे. खारघर मधील आरबीआय कॉलनी गेट आरएमसी, बेलपाडा जंक्शन, सेक्टर ६ मिशेलिन टायर, केसर हार्मनी गेट, सेक्टर ३५डी सिद्धिबेलेझ प्लॉट, बँक ऑफ इंडिया सेक्टर ३५, मेट्रो टर्निंग आरएमसी, व्हॅली शिल्प रोड, डी मार्ट सिग्नल, कोपरा ब्रिज एरिया, शिवमंदिर सेक्टर ११ अशा विविध ठिकाणी रस्ते दुरुस्तीचे कामांना गती देण्यात आली आहे. याबरोबरच नावडे उपविभागातदेखील रस्ते दुरुस्तीच्या कामांना प्राधान्य देण्यात आले असून या ठिकाणी रस्ते दुरुस्तीच्या कामे वेगाने सुरू आहेत.

याबरोबरच कामोठे प्रभागातील खांदा कॉलनी, सेक्टर ९, ११, १५, २०, कामोठे शहरातील मानसरोवर रेल्वे स्थानकाकडे मुख्य रस्ता, कामोठे गाव, केले सिनेमा रोड अशा विविध ठिकाणी रस्ते दुरुस्तीचे काम जोमाने सुरू आहे

पनवेल महापालिकेच्या वतीने शहरातील रस्ते दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहेत. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे व शहर अभियंता संजय कटेकर यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामांची माहिती घेतली. यावेळी नागरिकांची गैरसोय कमी व्हावी यासाठी तातडीने व नियोजनबद्ध पद्धतीने कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश कनिष्ठ अभियंत्यांना देण्यात आले.

महापालिकेच्या बांधकाम विभागाने प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र कनिष्ठ अभियंते नियुक्त केले असून त्यांच्या देखरेखीखाली रस्ते दुरुस्तीची कामे वेगाने पार पाडली जात आहेत.

या कामांच्या कालावधीत काही ठिकाणी वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी संयम बाळगावा व प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.



**पनवेल : ओंकार मित्र मंडळ, प्रभू आळी, पनवेल आयोजित ३५वा गणेश आगमन सोहळा शनिवारी दिमाखदार व भक्तिरसात झाला. यंदा मंडळाने बाप्पाचे श्रीकृष्ण स्वरूपातील आगमन करून पनवेलकरांसाठी खास आकर्षण निर्माण केले. या मंगलमय सोहळ्यात महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी सपत्नीक ममता म्हात्रे यांच्यासह उपस्थित राहून बाप्पाचे दर्शन घेतले.**

# वावंजेमध्ये दंगा काबू पथकाची रंगीत तालीम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद व संभाव्य मराठा आरक्षण आंदोलन अनुषंगाने पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीत २२ ऑगस्ट रोजी वावंजे गाव या ठिकाणी दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली.

या दंगा काबू योजनेत पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्यासह पाच सपोनि/पोउपनि, १६ अंमलदार, बीट मार्शल तीन वरील दोन अंमलदार, झोन तीन स्ट्राइकिंगसह नऊ अंमलदार, अग्निशामक वाहनसह एक अधिकारी चार अंमलदार, प्रा.आ केंद्र वावंजे कडील एक म्बुलन्स स्टाफसह हजर होते. दंगा काबू योजना संपल्यानंतर वावंजे गाव मंदिर/मशीद परिसर, चौक या ठिकाणी रूट मार्च करण्यात आला.

# कामोठे संत सेना नाभिक समाज मंडळाचा वर्धापन दिन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे संत सेना नाभिक समाज मंडळाचा ११ वा वर्धापन दिन शनिवारी साजरा झाला. या वर्धापनदिनानिमीत्त श्री सत्यानरायणाची महापूजा, पालखी सोहळा, रॅली तसेव स्नेहसंमेल आणि स्वागत समारंभाचे आयोजन करणभ्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील आणि कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली असून संत सेना नाभिक समाज मंडळाला ११ व्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



या वेळी नमिता ठाकूर, रजित कुमार, दि.बा.पाटील यांचे सुपूत्र अतुल पाटील, पनवेल महापालिकेचे माजी विरोधीपक्ष नेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, भाजपच्या जिल्हा चिटणीस विद्या तामखेडे, भाजपनेते रवि जोशी, भाउ भगत, हर्षवर्धन पाटील, प्रशांत कदम, संजय पाटील, मंडळाचे अध्यक्ष संतोष भोसले, सेनापती वाघ, अनुपम शर्मा, सचिव सरोज ठाकूर, सहसचिव शंभू ठाकूर, भाग्यनारायण ठाकूर, नीरज ठाकूर, सिहेश्वर ठाकूर, मोहन सोनवणे, अर्जुन ठाकूर, अभयकुमार शर्मा, मणिलाल वाडनंद, रामचंद्र शील, बबलू ठाकूर, कपिल ठाकूर, प्रभास ठाकूर यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# गरजू विद्यार्थ्यांच्या फीसाठी आर्थिक मदत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा येथील माध्यमिक विद्यालय विवेकानंद संकुल या शाळेमधील आर्थिक दुर्बल आणि गरजु विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय फीसाठी सानपाडा गार्डन ग्रुपतर्फे ५० हजार रुपये रकमेचा धनादेश मंडळाचे अध्यक्ष सदाशिव तावडे व नवी मुंबईचे शिवसेना उपजिल्हाप्रमुख मिलिंद सूर्याराव यांच्याहस्ते शुक्रवारी शाळेचे मुख्याध्यापक विलास व्हावळ यांना देण्यात आला.



या वेळी मंडळाचे पदाधिकारी सर्वश्री रणवीर पाटील, अशोक संकपाळ, पुरुषोत्तम शिरोळ, मारुती विश्वासराव, नरेश देशमुख, शामराव मोरे आदी उपस्थित होते. सानपाडा येथील माध्यमिक विद्यालय विवेकानंद संकुल सानपाडा या शाळेत घरकाम करणाऱ्या महिला, रिक्षा ड्रायव्हर, माथाडी कामगार अशा विविध लघुउद्योगात काम करणाऱ्या कामगारांची मुले आहेत. काही पालकांची वार्षिक फी भरण्यासाठी आर्थिक परिस्थिती नसते. त्यामुळे ९ वी आणि १० वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यासाठी अडचण येते. अशा गरजू विद्यार्थ्यांची यादी शाळेकडून आल्यानंतर या गरीब विद्यार्थ्यांना शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख मिलिंद सूर्याराव हे गेली अनेक पासून आर्थिक सहाय्य करतात. गेल्या वर्षी दहीहंडीचा कार्यक्रम अचानक रद्द झाल्यामुळे दही हंडीसाठी जमा झालेली रक्कम सर्वांच्या सहकार्याने मिलिंद सूर्याराव यांनी गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांच्या फीसाठी शाळेला दिली.

गरजू विद्यार्थ्यांना फी भरण्याच्या शैक्षणिक कार्यासाठी आर्थिक सहाय्य करणारे मिलिंद सुर्याराव यांचे शाळा व्यवस्थापक यांनी विशेष आभार आहेत.

# ग्रंथ पारायण सोहळ्याची सांगता

**उरण : बातमीदार**

उरणमध्ये वारकरी संप्रदायातील कीर्तनकार सखाराम गायकवाड यांनी ७५ वर्षापूर्वी ग्रंथ पोथी वाचन पारायणाची सुरुवात केली होती. ती परंपरा आजही ७५ वर्षे अखंडीतपणे सुरू आहे.

भाविक भक्तांना अध्यात्म्याची गोडी लागावी नामस्मरणाची गोडी लागावी, नामस्मरण करून मानवी जीवन सार्थक व्हावे. या दृष्टिकोनातून कीर्तनकार सखाराम गायकवाड यांनी उरण मध्ये सर्वप्रथम गणपती चौकातील गणपती मंदिर येथे पोथी वाचन पारायण सोहळ्याला सुरुवात केली होती. हा उपक्रम, पारायण सोहळा सार्वजनिक असल्याने सर्व जाती धर्माचे लोक या पारायण सोहळ्याला मोठ्या संख्येने सहभागी होत होते.



दरवर्षीप्रमाणे श्रावण महिना सुरू झाला की श्रावण महिन्याच्या पहिल्या दिवशी पारायण सोहळ्याला सुरुवात होते. हा पारायण सोहळा तब्बल एक महिना चालतो. सुरुवातीला श्री गणपती मंदिर येथे त्यानंतर श्रीराम मंदिर, त्यानंतर कोटनाका येथे नंतर बोरी येथे गायकवाड यांच्या घराच्या अंगणात पोथी वाचन पारायण सोहळा सुरू आहे. दरवर्षी वेगवेगळे गाथा ग्रंथ पारायण सोहळ्यात वाचले जाते. यंदा श्री भक्ती विजय ग्रंथ पारायण सोहळा मोठया उत्साहात झाले.

काशिनाथ गायकवाड, अनंत गायकवाड,सदानंद गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी हा परंपरा सोहळा आयोजित केले जाते. संदीप गायकवाड, सिद्धेश गायकवाड, प्रमीला गाडे, आरती गायकवाड, मंदार गायकवाड, अक्षता गायकवाड,स्वपना गायकवाड,डॉ भक्ती कुंदेलवार यांनी यावर्षी श्री भक्तीचे विजय ग्रंथाचे वाचन पारायण केले. २१ ऑगस्ट रोजी या ग्रंथ वाचन पोथी पारायण सोहळ्याची सांगता झाली.

# गव्हाण विद्यालयात आनंददायी शनिवार उत्साहात

## खेळ, मनोरंजन, सर्जनशीलता अन् अंधश्रद्धा निर्मूलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एक दिवस दप्तरावीन शाळा अर्थात आनंददायी शनिवार या शृंखलेत रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये केवळ आनंददायी नव्हे तर ज्ञानानंददायी शनिवार २३ ऑगस्ट २०२५ रोजी उत्साहात साजरा झाला.

विद्यार्थ्यांच्या सृजनशील वृत्तीस प्रोत्साहित करून सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी गणोशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणपती मूर्ती तयार करणे,आकर्षक सजावटीच्या माळा किंवा कंठी तयार करणे आदी उपक्रम राबवून आनंददायी शनिवार इयत्ता सहावी या वर्गांसाठी राबविण्यात आला.विद्यार्थ्यांनी नैसर्गिक माती आणि कृत्रिम क्ले पासून सुंदर व सुबक गणेशमूर्ती बनवून आपल्या सुप्त सर्जनशीलतेचे निर्मितीशील प्रकटीकरण केले.सिमरन संजय डाकवे,प्रणव म्हात्रे,मंजिरी किरण ठाकूर या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या गणपती मूर्ती विशेष आकर्षण ठरल्या.



विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जाणिवा प्रगल्भ होवून जिज्ञासा निर्माण व्हावी व अंधश्रद्धा दूर व्हावी या उद्देशाने पनवेल तालुक्यातील अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते मनोहर तांडेल यांचे प्रात्यक्षिकांसह समुपदेशन आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी जिज्ञासा वाढली, अंधश्रद्धा दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करण्याचा संदेश मिळाला. यामुळे हा शनिवार ज्ञानानंददायी शनिवार ठरला. या वेळी करुणा तांडेल यांनी 'एक होतं डोंगर' या बहारदार गीताने विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

विद्यार्थ्यांनी कॅरम, लुडो असे बैठे खेळ व लंगडी सारखा पारंपारिक खेळ खेळून आनंद व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी आनंददायी शनिवार या संकल्पने विषयी मनोगतांमधून आनंद व्यक्त केला. सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. आर.पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे आणि पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाच्या तंत्रस्नेही शिक्षिका माधुरी म्हात्रे व सहावी क चे वर्गशिक्षक प्रमोद करावकर यांचे सहकार्य लाभले. या वेळी कोपर गावचे संदीप वामन म्हात्रे यांच्यावतीने उपक्रमातील विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहार वाटप करण्यात आला.

# दिव्यांग विद्यार्थ्यांनी घडवल्या आकर्षक गणेशमूर्ती

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका ईटीसी अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राद्वारे दिव्यांग मुलांना सर्व सामाजिक उत्सव, परंपरा, संस्कृती यांची माहिती व्हावी या हेतूने विविध उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून गणेशमूर्ती बनविण्याच्या दोन कार्यशाळा ईटीसी केंद्रामध्ये आयोजित करण्यात आल्या ज्यामध्ये सर्व दिव्यांग मुले उत्साहाने सहभागी झाली.



एकाच छताखाली विविध प्रकारच्या दिव्यांगांना शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्र पुरविणारे देशातील अग्रगण्य केंद्र म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेचे ईटीसी केंद्र ओळखले जाते. याठिकाणी २७ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण दक्षता मंडळ व एनव्हायरो व्हिजिल या पर्यावरण क्षेत्रात कार्यरत संस्थांच्या मार्गदर्शनाखाली गणेशमूर्ती बनविणे कार्यशआळा घेण्यात आली. यामध्ये केंद्रातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी स्वहस्ते शाडूमातीच्या पर्यावरणपूरक गणेश मूर्ती साकारून स्वच्छ भारतचा संदेश दिला. ही कार्यशाळा रोटरी क्लब ऑफ पाम बीच यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आली होती.

यामध्ये कर्णबधिर, मतिमंद व इतर दिव्यांग विद्यार्थ्यांनी अमाप उत्साहात सहभाग घेतला. या कार्यशाळेत दिलेल्या प्रशिक्षणानुसार विशेष मुलांनी शाडूच्या अतिशय सुंदर अशा गणेश मूर्ती साकारल्या. या वेळी क्लबच्या वतीने मुलांना खाऊ वाटपही करण्यात आले. अशाच प्रकारच्या दुसऱ्या कार्यशाळेत टेरिकोटा मातीपासून मुलांना गणेशमूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या वेळी मुलांसह पालकांनीही उत्स्फुर्त सहभाग घेतला.

अशा अभिनव उपक्रमांतून पर्यावरण रक्षण, उत्सवाची परंपरा तसेच दिव्यांग मुलांमधील कलागुणांचा अविष्कार होणे ही खूप चांगली बाब आहे, असे मत मांडत केंद्राच्या संचालिका सहा. आयुक्त डॉ. अनुराधा बाबर यांनी मुलांनी बनविलेल्या मूर्ती पाहून सर्वांचे कौतुक केले. प्लास्टर ऑफ पॅरिसचा वापर टाळून शाडू मातीच्या व टेरिकोटा मातीच्या मूर्ती पूजनासाठी वापरणे पर्यावरणहिताय असल्याची भूमिका मांडत पर्यावरणशील प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पॉश कायद्याबाबत मार्गदर्शन सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.२३) महिला समानता दिनानिमित्त महिला विकास कक्षाच्या वतीने महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक 'पॉश' कायदा या विषयावर विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. हे सत्र महिला समानता दिनाचे औचित्य साधून घेण्यात आले.

या सत्रासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून धनश्री कदम, सहाय्यक प्राध्यापक, भागुबाई चांगु काना ठाकूर महाविद्यालय, न्यू पनवेल या उपस्थित होत्या यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना पॉश कायद्याचे महत्त्व, कार्यस्थळी महिला सुरक्षेची गरज व याबाबत असलेली जबाबदारी यावर सविस्तर आणि अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले, तसेच त्यांनी ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल महिला विकास कक्षाच्या प्रति विशेष त्यांचे विशेष आभार मानले.

या कार्यक्रमाचे संयोजन महिला विकास कक्षाच्या समन्वयक प्रा. सोनी पांडे यांनी केले तसेच महिला विकास कक्षाच्या इतर सदस्यांनीही कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मेहनत घेतली. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पॉश कायद्याची जाणीव आणि कार्यस्थळी महिलांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वाचे पाऊल ठरला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षक आदींनी सहकार्य केले.

# श्रीवर्धन शहरात वाहतूक कोंडीची समस्या जटील

## ◆ आणखी एक वाहतूक पोलीस नियुक्त करण्याची मागणी

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरात वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे. या कोंडीमुळे पाच मिनिटांच्या प्रवासासाठी नागरिकांना २० ते २५ मिनिटे वाया घालवावी लागतात. शहरातील वाणी आळी परिसरात बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया, युनियन बँक, अण्णा साहेब सावंत को.ऑपरेटिव्ह अर्बन बँक इत्यादी बँकेच्या शाखा आहेत. त्यासह विविध फायनान्स कंपन्यांच्यादेखील शाखा आहेत. त्यामुळे या परिसरामध्ये बँकेत कामानिमित्त जाणारे नागरिक रस्त्याच्या दुतर्फा वेड्यावाकड्या दुचाकी उभ्या करत असल्याने नेहमीच वाहतूक कोंडी होत असते.

शहरातील टिळक मार्ग परिसरातदेखील हीच परिस्थिती आहे, तर श्रीवर्धन बाजारपेठेत अक्षरशः दुचाकींचे वाहनतळ आहे की काय? अशी शंका निर्माण होते, कारण संपूर्ण बाजारपेठेत रस्त्याच्या दोन्ही बाजूला कशाही वेड्यावाकड्या दुचाकी उभ्या केलेल्या असतात. त्यातच या ठिकाणी असलेल्या व्यापाऱ्यांकडे माल खाली करण्यासाठी ट्रक किंवा टेम्पो आल्यानंतर वाहतुकीच्या कोंडीत मोठ्या प्रमाणावर भर पडते. मच्छी मार्केट, भाजी मार्केट या परिसरात नेहमीच बेशिस्तपणे वेड्यावाकड्या दुचाकी उभ्या केलेल्या पहायला मिळतात. श्रीवर्धन शहरात काही अधिकृत रिक्षा स्टॅण्ड वगळता अन्य ठिकाणी रिक्षाचालकांनी आपल्या रिक्षा उभ्या करून रिक्षा स्टॅण्ड तयार केले आहेत.



पेशवे आळी ते बाजारपेठ या कोपरी मार्ग ठिकाणी आपला बाजार दुकानासमोर रोज दहा ते बारा रिक्षा रांगेत उभ्या असतात. त्यामुळे या परिसरातदेखील मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागतो. श्रीवर्धन भाजी मार्केट समोर असलेल्या एका मिठाईच्या व्यापाऱ्याने तर आपल्या दुकानासमोर मोठा लाकडी फलाट आणून ठेवला आहे. हा रस्ता नगरपालिकेचा असताना अशा प्रकारे फलाट टाकून जागा अडविण्याचा प्रकार आहे. संबंधित व्यापारावर नगर परिषदेने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

संपूर्ण श्रीवर्धन शहरात वाहतुकीचे नियमन करण्यासाठी एकच वाहतूक पोलीस तैनात असतो. तोदेखील श्रीवर्धनच्या प्रवेशद्वारावर असलेल्या कमानीजवळ उभा असलेला पहायला मिळतो. वाणी आळी, बाजारपेठ, टिळक मार्ग या परिसरात कितीही वाहतूक कोंडी झाली तरी कोणीही पोलीस त्या ठिकाणी वाहतूक कोंडी मोकळी करण्यासाठी उपलब्ध नसतात.

आता गौरी गणपतीच्या सणासुदीला अनेक चाकरमानी गावाकडे येणार आहेत. त्यामुळे बाजारपेठेत गर्दी उसळणार आहे. म्हणून रायगडच्या जिल्हा वाहतूक शाखेने श्रीवर्धन शहरात अजून एका वाहतूक पोलिसाची नियुक्ती करण्याची आवश्यकता आहे.

वाहतूक कोंडीत भर होण्याचे दुसरे कारण भाजी मार्केटमध्ये अनेक भाजी व्यापारी रस्त्यावर प्लास्टिकचे क्रेट ठेवून त्यावर भाजी विकायला ठेवतात. त्यामुळे रस्त्याची दोन दोन फूट जागा व्यापली जाते. अशा रस्ता अडवणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# डासांपासून होणाऱ्या आजारांबाबत जनजागृती



**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन विज्ञान महाविद्यालयामार्फत जागतिक डास दिनानिमित्त विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. डासांमुळे उद्भवणाऱ्या आजारांवर अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती करण्यात आली.

या विशेष उपक्रमात मुरूड शहरातील नगर परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना डासांपासून होणाऱ्या आजारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया, फिलेरिया अशा डासांमुळे होणाऱ्या आजारांची माहिती देऊन स्वच्छता व प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे महत्त्व पटवून देण्यात आले. या उपक्रमामध्ये अंजुमन विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सादरीकरण, माहितीपत्रक वितरण व प्रत्यक्ष संवादातून विद्यार्थ्यांना जागरूक केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा. जावेद खान, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागप्रमुख प्रा. रहीम बागवान तसेच विद्यार्थ्यांमध्ये जारा खानजादा, जुवेरिया कलबस्कर, फातिमा जमरुतखाणी आणि आमीना किल्लेदार उपस्थित होते. या विशेष मोहिमेबद्दल पालक व स्थानिक समाजाकडून समाधान व्यक्त करण्यात आले असून स्वच्छ व निरोगी परिसर राखण्यासाठी विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नाचे कौतुक होत आहे.

# वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तात्पुरते बसथांबे

## ■ गणेशोत्सवासाठी माणगाव आगाराचे महत्त्वपूर्ण पाऊल

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

गणेशोत्सव काळात कोकणात होणाऱ्या प्रचंड गर्दीच्या पार्श्वभूमीवर माणगाव शहरात होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रायगड प्रादेशिक परिवहन महामंडळाने विशेष उपाययोजना आखली आहे. २३ ते २८ ऑगस्ट तसेच २ ते ८ सप्टेंबर या कालावधीत माणगाव मुख्य बसस्थानकावर बसथांबण्यास बंदी घालून पर्यायी ठिकाणी प्रवासी चढ-उताराची व्यवस्था करण्यात आली आहे. गणेशभक्त, प्रवासी नागरिक व वाहनचालकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन माणगाव बस आगाराच्या व्यवस्थापक छाया कोळी यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकातून केले आहे.

गणेशोत्सव हा कोकणातील सर्वात मोठा उत्सव. या काळात मुंबई, पुणे व इतर भागांतून कोकणाकडे जाणाऱ्या भाविकांची प्रचंड गर्दी उसळते. परिणामी माणगाव शहरातील वाहतूक कोंडी गंभीर समस्या बनते. या वर्षी ही परिस्थिती लक्षात घेऊन रायगड प्रादेशिक परिवहन महामंडळाने महत्त्वपूर्ण निर्णय घेते माणगाव शहरात वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी उपाययोजना आखण्यात आली आहे.

२३ ते २८ ऑगस्ट तसेच २ ते ८ सप्टेंबर या कालावधीत माणगाव शहरातील रा.प. बसस्थानक परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी खास पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. या निर्णयानुसार मुंबईकडून महाडमार्गे कोकणात जाणाऱ्या बसेस हॉटेल खिलार, स्वस्तिक कॉम्प्लेक्स येथे प्रवासी चढ-उतार करतील. पुण्याकडून कोकणात येणाऱ्या बसेसना रेल्वे पुलाजवळील पटेलबिल्डर्स बिल्डिंगसमोरील जागा निश्चित करण्यात आली आहे.

श्रीवर्धन व म्हसळामार्गे जाणाऱ्या बससेवांसाठी सरकारी दवाखाना व बँक ऑफ बडोदाच्या गेटसमोर प्रवासी व्यवस्था केली जाईल, तर मुंबईकडून थेट कोकणात जाणाऱ्या बसेस लोणेरे येथील आर्या हॉटेलपाशी थांबवून प्रवासी चढ-उतार करतील. या निर्णयामुळे माणगाव शहरातील मुख्य चौक, बसस्थानक परिसर व मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. गणेशोत्सव काळात वाढणारी वाहतूक व भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता प्रशासनाने आखलेल्या या उपाययोजनेचे स्वागत होत आहे. स्थानिक नागरिक व प्रवाशांनीही या पर्यायी व्यवस्था सहकार्याने स्वीकारल्यास कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना सुखकर प्रवासाचा अनुभव घेता येईल. वाहतूक कोंडी कमी करून गणेशोत्सवाचा आनंद अधिक उत्साहाने घेण्यासाठी ही उपाययोजना महत्त्वाची ठरणार आहे.

# कर्जतच्या रस्त्यांवरील खड्डे भरण्यास सुरुवात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील रस्त्यांवरील खड्डे भरण्यात यावेत यासाठी पोलीस मित्र संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम यांनी साखळी उपोषण सुरू केले होते. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम खात्याच्या चारही विभागाच्या माध्यमातून सर्व रस्ते खड्डेमुक्त करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. त्यामुळे संघटनेने उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे.

कर्जत तालुक्यातील विविध रस्त्यांवर असलेल्या खड्ड्यात बसून आंदोलन करण्यास सुरुवात जुलै २०२५पासून पोलीस मित्र संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम यांनी केली होती. संघटनेच्या वतीने तालुक्यातील सर्व रस्ते सर्व बांधकाम विभागाकडून खड्डेमुक्त करण्यासाठी पोलीस मित्र संघटना आवाज उठवत होती. गेले एक महिना सर्व विभागांच्या रस्त्यांवरील पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बसून ठिय्या आंदोलन करण्यात आले. त्यानंतर कदम यांनी कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या छत्रपती संभाजी महाराज चौकात बेमुदत साखळी उपोषण केले. आगामी गणेशोत्सव लक्षात घेऊन त्याआधी तालुक्यातील सर्व रस्ते खड्डेमुक्त व्हावेत, अशी उपोषणकर्त्यांची मागणी होती. हे आंदोलन सुरू झाल्यानंतर अनेक राजकीय पक्षांनी आणि सामाजिक संस्था यांनी पाठिंबा दिला होता. गणेशोत्सव लक्षात घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांवरील खड्डे भरण्यास सहमती दर्शविली. राज्य रस्ते विकास महामंडळ आणि कर्जत नगर परिषद बांधकाम विभाग यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागाने निधी उपलब्ध झाल्यानंतर आपल्या हद्दीतील रस्त्यावरील खड्डे भरले जातील, असे आश्वासन दिले, तर कर्जत शहरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे पालिकेचा बांधकाम विभाग भरणार आहे. याची कार्यवाहीदेखील सुरू झाली असून त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

# सुयश करंजकर कोस्ते बु. येथील पहिला पोलीस बनला

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील कोस्ते बुद्रुक येथील सुयश संजू करंजकर या तरुणाने गावातील पहिला पोलीस होण्याचा मान पटकावला असून त्याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



सुयश करंजकर याचे पहिली ते चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण गावात झाले. पुढील पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण तालुक्यातील ग.रा.मेथा माध्यमिक विद्यालय निजामपूर येथे होऊन महाविद्यालयीन शिक्षण अकरावी ते बारावीपर्यंत त्याने अशोकदादा साबळे ज्युनिअर कॉलेज माणगाव येथे घेतले. त्यानंतर त्याने पुढे पोलीस होण्याचा मनोदय केला. यासाठी त्याने माणगाव येथील स्वराज करिअर अकॅडमीमध्ये २०२२ ते २०२४पर्यंत प्रशिक्षण घेतले. या ठिकाणी सुयशला अकॅडमीचे संस्थापक परेश कोटकर,रायगड पोलीस अभिषेक पारधी यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले.

ज्याच्या नावातच सुयश त्याने यश संपादन केले. तालमीत पोलीस भरतीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व पात्रता सुयशने अथक परिश्रम घेत जिद्द, चिकाटीच्या जोरावर पूर्ण केले. त्याच्या या मेहनतीचे फळ त्याला मिळून त्याची नवी मुंबई येथे राज्य राखीव पोलीसपदी निवड झाली आहे. आपल्या गावातील मुलाची पोलीस दलात भरती झाल्याने कोस्ते बुद्रुक गावात आनंदाचे वातावरण असून सुयशला ग्रामस्थांबरोबरच त्याचे नातेवाईक व मित्रपरिवार यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# भेंडखोलमध्ये बैलपोळा उत्साहात



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

सावित्री-सिंधू नदीच्या काठावर वसलेल्या निसर्गरम्य भेंडखोल गावात बैलपोळा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हरिहरेश्वर समूह ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय पाटील (बावा भंडारी) व परिवार यांच्या पुढाकाराने पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात हा सोहळा रंगला.

शेतकऱ्यांचा खरा मित्र मानल्या जाणाऱ्या बैलाला या दिवशी विशेष सन्मान दिला जातो. सकाळी बैलांना स्वच्छ आंघोळ घालून, फुलांच्या माळा, रंगीबेरंगी रिबिन्स व सुंदर वस्त्रांनी सजवण्यात आले. सजवलेले बैल गावातून मिरवणुकीतून नेण्यात आले. गावातील माता-भगिनींनी विधीपूर्वक पूजा करून औक्षण व आरती केली. या दिवशी बैलांकडून कोणतेही काम करून घेतले जात नाही, उलट त्यांना विश्रांती दिली जाते.

उत्सवाच्या निमित्ताने शेतकरी परिवारांनी सर्व मान्यवरांना पारंपरिक गोडधोड जेवण देऊन सत्कार केला. गावभर आला रे आला बैलपोळा आला, गाव झालं सारं गोळा अशा जयघोषात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

या सोहळ्यात गावातील शेतकरी मित्र स्वप्नील कोलथरकर, प्रथमेश कोलथरकर, केतन कोलथरकर, चेतन कोलथरकर, अथर्व अंजरकर, राजेंद्र अंजरकर, बाळू पाटील, निखिल पाटील, तुषार पेडणेकर, अंकित कोलथरकर, विशाल कोलथरकर, अभय कोलथरकर, अजित पावसाळकर आदींनी सहभाग घेतला. सर्वांनी मिळून आनंद, उत्साह आणि कृतज्ञतेच्या भावनेने हा पारंपरिक उत्सव साजरा केला.

# समीर शेडगेंकडून शैक्षणिक साहित्य भेट

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा एज्युकेशन अ‍ॅण्ड वेल्फेअर असोसिएशन आणि रोहा अष्टमी अलखैरिया कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या सायन्स जुनिअर कॉलेज आणि रेवा इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांसाठी कै. जनार्दन शेडगे ट्रस्टतर्फे माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांच्याकडून दोन संगणक, एक प्रिंटर, एक बायोमेट्रिक मशीन भेट स्वरूपात देण्यात आल्या. माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे यांच्या हस्ते संगणक कक्षाचे वाटप झाले.



या कार्यक्रमास रियाज शेटे, कादिर रोगे, शफी पानसरे, मुनावर पठाण, मजहर सिद्दिकी, इलियाज डबीर, अहमद दर्जी, फारुख सवाल, समीर दर्जी, महेश सरदार, जुबेर चौगुले उस्मान रोहेकर, डॉ. फरिद चिमावकर, डॉ. अविनाश शेडगे, सौ. नीता हजारे, महाडकर, डॉ. अपूर्व भट, मुबीन करंजीकर, समीर दाखवे, मुजमीर येरुणकर, आरिफ पठाण, बिलाल मोरबेकर, स्वप्नील धनावडे, अजिंक्य कोंढाळकर यांच्यासह पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे म्हणाले की, जिद्द व मेहनतीने कै. जनार्दन मारुती शेडगे यांनी कमविलेले धन टिकवणे व त्याचा योग्य उपयोग करणे महत्त्वाचे आहे. त्यांचा वारसा समीर व सचिन शेडगे बंधू योग्य पद्धतीने पुढे चालवत असून त्यांनी दानशूर वृत्ती कायम ठेवली आहे. समीर शेडगे हे शाळा, कॉलेज, मंदिर अन्य संस्थांना रोख व वस्तूरूपाने देणगी देतात. हा त्यांचा स्तुत्य उपक्रम आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. माजी नगराध्यक्ष शेडगे यांनी, विज्ञान आणि संगणक युगात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जिकडे तिकडे स्पर्धा सुरू आहेत. पूर्वी मुस्लिम समाजात महिलांचे शिक्षणाचे प्रमाण कमी होते, परंतु आता मुस्लिम मुली-महिलाही डॉक्टर, वकील होत आहेत. येथील शिक्षण झाल्यावर उच्च शिक्षणासाठी मुंबई, पुणे व अन्य मोठ्या शहरात जाऊन आपले शिक्षण पूर्ण करतात, असे सांगून प्राथमिक इंग्रजी शिक्षणासाठी रोहा व अष्टमी येथील समाज बांधवांनी शैक्षणिक संस्था उभ्या केल्या. त्या उत्तम प्रकारे चालवत आहेत याचे मला मनस्वी समाधान वाटत आहे. यापुढे भविष्यात कोणत्याही वस्तूची गरज असल्यास हाक द्या. मी केव्हाही मदत करण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष रियाज सिटी यांनी संगणक व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल शेडगे यांना धन्यवाद दिले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सलीम उलडे यांनी केले, तर आभार डॉ. फरीद चिमावकर यांनी मानले.

# रातवड विद्यालयात सूर्यनमस्कार अनुष्ठान

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रावण महिना सणांचा आहे तसाच तो आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. व्रत वैकल्य करीत सुदृढ आरोग्याच्या दृष्टीने श्रावणाचे विशेष स्थान आहे. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याच्या दृष्टीने जागरूकता यावी व व्यायामाची सवय लागावी या हेतूने छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड येथे श्रावणानिमित्त एक लक्ष सूर्यनमस्कार यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते.



श्रावण महिन्यात विद्यालयात दररोज प्रत्येक विद्यार्थ्याने एक पूर्ण आवर्तन म्हणजेच तेरा सूर्यनमस्कार घातले.सूर्याची बारा नावे व सूर्यनमस्कार मंत्र म्हणून विद्यार्थी दररोज एक आवर्तन पूर्ण करत होते तसेच घरीही आवर्तन घालत होते. पूर्ण महिनाभरात एक लक्ष नमस्कार घालण्याचे उद्दिष्ट ठेवून आवश्यकतेनुसार सरावाने अवर्तनामध्ये वाढ करण्यात आली.

या अनुष्ठानाची सांगता नुकतीच करण्यात आली. महिनाभर चांगले सूर्यनमस्कार व योग्य कृती करणाऱ्या विद्याार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. विद्यालयाचे शिक्षक राजेंद्र भगत यांनी सूर्यनमस्काराचे महत्त्व व आरोग्यासाठी व्यायामाची आवश्यकता याबाबत विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. क्रीडा शिक्षक श्रीकृष्ण गरधे यांनी या कार्यक्रमाचे संचालन केले. मुख्याध्यापक संतोष कदम यांच्या मार्गदर्शनातून उत्साहपूर्ण वातावरणात सूर्यनमस्कार अनुष्ठान यज्ञ पूर्णत्वास आला.

